

# सिक्युरिटीज मार्केट

## विषयी पुस्तिका

**गुंतवणूकदारांना ध्यानात ठेवून दिलेली माहिती**

भारतीय प्रतिभूति और विनिमय बोर्ड
Securities and Exchange Board of India



BSE INVESTORS' PROTECTION FUND | NSE IPFT | MSE METROPOLITAN STOCK EXCHANGE Investor Protection Fund Trust | NSDL Technology, Trust & Reach IPFT | CDSL

**खुलासाः**

या प्रकाशनात त्रुटी किंवा चुका असू नये यासाठी सर्वतोपरि प्रयत्न केले गेले आहेत. प्रकाशक या सामग्रीच्या वापराने कोणत्याही प्रकारे, कोणत्याही नुकसानासाठी उत्तरदायी नाही आहे.

**पुस्तिका संयुक्तपणे तयार करणाऱ्या संस्थाः**

- भारतीय प्रतिभूती आणि विनियम बोर्ड (सेबी)
- बीएसई लि.
- नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लि.
- नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लि.
- सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया)लि.
- मेट्रोपॉलिटन स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लि.

**मुद्रणः**

सेबी
२३ नोव्हेंबर २०२०

**वाचकांना सूचनाः**
या पुस्तिकेचा उद्देश्य सिक्युरिटीज मार्केट विषयी संक्षिप्त तसेच मूलभूत माहिती प्रदान करणे आहे. सेबी, बीएसई, एनएसई, एनएसडीएल तसेच सीडीएसएलच्यां संकेतस्थळांवर अतिरिक्त माहिती पाहिली जाऊ शकते.

या पुस्तिकेत समाविष्ट माहिती सिक्युरिटीज मार्केट संबंधित शैक्षणिक आणि जागरुकतेसाठी आहे. याचा उपयोग मात्रा सामान्य जनतेला शैक्षणिक आणि जागरुकता आणण्याच्या प्रवृत्तीने केला जावा, कोणत्याही प्रकारे नफा कमवण्यासाठी नाही.

या सामग्रीचा कोणताही भाग सेबी, स्टॉक एक्सचेंज किंवा डिपॉझिटरीज यांना न कळवता डिस्क, टेप, पर्फोरेट मीडिया किंवा इतर माहिती संग्रह उपकरण इ. वर कोणत्याही स्वरूपात पुनः मुद्रित केला जाउ शकत नाही.

पुस्तिकेचा उपयोग करून कोणत्याही प्रकारे कोणतेही नुकसान वा हानि झाल्यास त्यासाठी सेबी, स्टॉक एक्सचेंज किंवा डिपॉझिटरीज जबाबदार राहणार नाही.

या सामग्रीत कोणतीही त्रुटी राहणार नाही यासाठी पूर्ण प्रयत्न केले गेले आहेत. बाजारात होणाऱ्या नवीन फेरबदलां विषयी व इतर घडामोडीं विषयी जाणून घेण्यासाठी वाचकांनी वेळोवेळी घोषित केलेले कायदे, मार्गदर्शिका, दिशानिर्देश तसेच इतर संबंधित कागदपत्रांचा संदर्भ घ्यावा. कोणत्याही सूचनांसाठी किंवा प्रतिभावासाठी ई-मेल कराः visitsebi@sebi.gov.in.

| अनुक्रमणिका | | Page No. |
|---|---|---|
| **सिक्युटीज मार्केटचा परिचय** | | |
| १. | प्रतिभूती बाजारासाठी नियामक पाया | ०२ |
| २. | प्रतिभूति बाजार (सिक्युरिटीज मार्केट) काय आहे? | ०३ |
| ३. | प्राथमिक बाजार आणि द्वितीयक बाजार | ०५ |
| ४. | प्रतिभूति बाजारात मार्केट इन्फ्रास्ट्रक्चर इंस्टीट्यूशंस व मार्केट मध्यस्थ कोण आहेत? | ०७ |
| **गुंतवणूकीच्या मूळ बाबी** | | |
| ५. | प्रतिभूति बाजारात गुंतवणूकीचे प्रमुख धोके | ०९ |
| ६. | जोखमेला कमी कसे केले जाते? | १० |
| **खाते उघडण्याची प्रक्रिया** | | |
| ७. | प्रतिभूति बाजारात गुंतवणूकीसाठी पूर्व-आवश्यकता | १० |
| ८. | खाते उघडण्याची प्रक्रिया: नो युअर क्लायंट (केव्हायसी) प्रक्रिया | ११ |
| ९. | बेसिक सर्व्हिसेस डिमॅट अकांउट (बीएसडीए) | १२ |
| १०. | पॉवर ऑफ ॲटर्नी | १३ |
| ११. | नामांकन | १४ |
| **प्रतिभूति बाजारात कशी गुंतवणूक करू?** | | |
| १२. | प्राथमिक बाजाराद्वारे गुंतवणूक | १४ |
| १३. | प्राथमिक बाजारात गुंतवणूकीची प्रक्रिया | १५ |
| १४. | ॲप्लिकेशन सपोर्टेड बाय ब्लॉक्ड अमाउंट (आस्बा) | १६ |
| १५. | द्वितीयक बाजाराद्वारे गुंतवणूक | १६ |
| १६. | ट्रेडिंग दिवस तसेच ट्रेडिंग आणि सेटलमेंट चक्र | १७ |
| १७. | कॉंट्रॅक्ट नोट | १८ |
| १८. | गुंतवणूकदारास एसएमएस आणि ई-मेल सूचना | १९ |
| १९. | रनिंग खाते अधिकारिता | २० |
| २०. | ट्रेड पडताळणी | २० |
| २१. | मार्जिन मनी काय आहे? | २१ |
| २२. | स्टॉक ब्रोकर आणि डिपॉजिटरी पार्टिसिपंट्स कडून खात्याचा तपशील प्राप्त करा | २१ |
| २३. | कंसोलिडेटेड खाते स्टेटमेंट (सीएएस) | २२ |
| २४. | डेरिवेटिव्ह बाजार | २२ |
| **म्युच्युअल फंड आणि ईटिएफ** | | |
| २५. | म्युच्युअल फंड्स | २३ |
| २६. | म्युच्युअल फंडात गुंतवणूक कशी करावी? | २४ |
| २७. | म्युच्युअल फंड्सच्या उत्पादांचे लेबलिंग | २४ |
| २८. | एक्सचेंज ट्रेडेड फंड्स (ईटीएफ) | २५ |
| **सिक्युरिटीज मार्केटमधे तक्रारीचे निवारण** | | |
| २९. | सेबी कंप्लेंट्स रिड्रेस सिस्टम (स्कोर्स) | २५ |
| ३०. | स्टॉक एक्सचेंज व डिपॉझिटरीचा इन्व्हेस्टर सर्व्हिसेस सेल | २६ |
| ३१. | आर्बिट्रेशन मॅकेनिज्म | २७ |

| | | |
|---|---|---|
| दावा किंवा पेमेंट न केलेल्या रक्कमेविषयी माहिती | | २७ |
| **परिशिष्ट** | | |
| ३२. | परिशिष्ट-१ : सिक्युरिटीज मार्केटमधे गुंतवणूक/ट्रेडिंगसाठी काय करावे वकाय करू नये | २८ |
| ३३. | परिशिष्ट-२ : गुंतवणूकदारांचे अधिकार व जबाबदाऱ्या | ३० |
| ३४. | परिशिष्ट-३ : अनोंदणीकृत गुंतवणूक सल्लागारांपासून सावधानी रहा | ३१ |
| ३५. | परिशिष्ट-४ : आस्बा मधे युनिफाइड इंटरफेस (यूपीआय) | ३४ |
| ३६. | परिशिष्ट-५ : शब्दकोष | ३५ |

प्रस्तुतकर्ता:

भारतीय प्रतिभूति और विनिमय बोर्ड
Securities and Exchange Board of India

NSE IPFT

BSE INVESTORS' PROTECTION FUND

MSE METROPOLITAN STOCK EXCHANGE Investor Protection Fund Trust

NSDL Technology, Trust & Reach IPFT

CDSL

नमस्कार,

काय आपण प्रतिभूती बाजारात (सिक्युरिटीज मार्केट) गुंतवणुकीची इच्छा बाळगून असणारे एक गुंतवणुकदार आहात?

जर हो, तर प्रतिभूती बाजारात गुंतवणूक करण्यापूर्वी तुम्हाला प्रतिभूती बाजारातील मूलभूत सिद्धांतांना समजून घ्यावे लागेल. ही पुस्तिका कोणत्याही विशिष्ट गुंतवणूकीसाठी मार्गदर्शन देत नाही, उलट प्रतिभूती बाजाराची माहिती प्रदान करत आहे.

ही पुस्तिका भारतीय रिजर्व बँक (आरबीआय), इंश्योरंस रेग्युलेटरी अँड डेव्हलपमेंट अथॉरिटी ऑफ इंडिया (आयआरडीएआय) पेन्शन फंड रेग्युलेटरी अँड डेव्हलमेंट अथॉरिटी (पीएफआरडीए), कॉर्पोरेट अफेयर्स मंत्रालय इ. नियामकांअन्वये संस्थांमधे रक्कम गुंतवणूक करण्या संबंधित नाही आहे.

# १

## प्रतिभूती बाजारासाठी नियामक पाया




कंपन्यांचे शेयर्स, म्युच्युअल फंड्स युनिट्स, डेरिव्हेटिव्ज, इ. सिक्युरिटीजची खरेदी-विक्री तसेच व्यवहार आणि स्टॉक एक्सचेंज, कमॉडिटी डेरिव्हेटिव्ज एक्सचेंज व डिपॉजिटरीजच्या नियमनाचे कार्य सेबी ॲक्ट, १९९२ आणि सेबीचे दिशानिर्देश/परिपत्र/मार्गदर्शिका/निर्देश यांच्या अंतर्गत सिक्युरिटीज ॲंड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (सेबी) च्या कार्यक्षेत्रात येतात.

सेबीची स्थापना १२ एप्रिल १९९२ मध्ये सेबी अधिनियमांच्या तरतूदी अनुसार केली होती. सेबीची जबाबदारी सिक्युरिटीज मध्ये गुंतवणूकदारांच्या हितांचे रक्षण करणे, सिक्युरिटीज मार्केटचे नियमन करणे आणि सिक्युरिटीज मार्केट संबंधी इतर कार्य पार पाडणे आहे.

### वर्तमानात प्रतिभूती बाजार निम्न वर्णित चार अधिनियमांद्वारे शासित आहेः-

अ) द सेबी ॲक्ट, १९९२, जो (१) प्रतिभूतींमध्ये गुंतवणूकदारांच्या हितांची सुरक्षा (२) प्रतिभूती बाजाराच्या विकासास वाढवणे (३) प्रतिभूती बाजाराच्या विनियमनाकरिता वैधानिक अधिकार देतो.

ब) द कंपनीज ॲक्ट, २०१३ जो प्रतिभूतींच्या पब्लिक इश्यूमध्ये प्रतिभूती जारी करणे, अलॉट करणे वा हस्तांतरण करणे किंवा त्यासंबंधित बाबींसाठी नियम प्रदान करतो.

क) द सिक्युरिटीज कॉंट्रॅक्ट ॲक्ट १९५६, जो स्टॉक एक्सचेंज मध्ये व्यवहारांच्या मान्यतेसाठी नियमन व ओळख प्रदान करतो.

ड) द डिपोजिटरीज ॲक्ट १९९६, जो डिमटेरियलाज्ड समभागांच्या (डीमॅट शेअर) मालकीचे हस्तांतरण आणि इलेक्ट्रॉनिक राखण प्रदान करतो.



# २

## सिक्युरिटीज (प्रतिभूती) आणि प्रतिभूती बाजार काय आहे?



**अ. इक्विटी शेयर्सला सामान्यतः** शेयर्स म्हणतात, जे कंपनीमधील मालकी हक्क दर्शवितात. जो गुंतवणूकदार एखाद्या कंपनीत गुंतवणूक करतो त्याला भागधारक (शेयरहॉल्डर) म्हटले जाते आणि त्याला कंपनीच्या नफ्यापासून लाभांश मिळण्याचा हक्क असतो. कंपनीच्या सर्व सर्वसाधारण सभांमध्ये गुंतवणूकदारास कंपनीच्या निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत मतदान करण्याचा अधिकार देखील असतो.




**ब. कर्ज रोखे (डेब्ट सिक्युरिटीज)** गुंतवणूकदाराकडून कंपनीने/संस्थेने घेतलेल्या कर्जाचे प्रतिनिधित्व करतात आणि कंपनीने गुंतवणूकदाराला त्याचा भरणा केला पाहिजे. डेब्ट सिक्युरिटीज याला डिबेंचर्स किंवा बाँड्स देखील म्हणतात. कर्जाच्या सिक्युरिटीजमध्ये गुंतवणूक करणारा गुंतवणूकदार व्याजाचे पैसे आणि मुख्य रकमेची (मुद्दल) भरपाई घेण्यास पात्र आहे. डेब्ट सिक्युरिटीज एका ठराविक मुदतीसाठी दिले जातात, जे कालावधीच्या शेवटी सिक्युरिटीज इश्यूअरद्वारे सोडविले जातात. कर्ज रोखे सुरक्षित (सिक्युअर्ड) किंवा असुरक्षित (अनसिक्युअर्ड) असू शकतात.



**क.** डेरिव्हेटिव्ज हे आर्थिक साधन आहे ज्याचे मूल्य शेयर्स, डेब्ट सिक्युरिटीज इत्यादी इतर मालमत्तांवर अवलंबून असते. एक्सचेंज ट्रेड डेरिव्हेटिव्हजचे मुख्य प्रकार म्हणजे फ्युचर्स आणि ऑप्शन्स.



**ड.** म्युच्युअल फंड हा अशा प्रकारचा आर्थिक साधन प्रकार आहे, ज्याची रचना बऱ्याच गुंतवणूकदारांकडून जमा झालेल्या निधीतून तयार केली गेली आहे. हे फंड/म्युच्युअल फंड नंतर सिक्युरिटीजमध्ये जसे बाँड्स, मनी मार्केट फंड आणि इतर मालमत्तांमध्ये गुंतवणूक करतात.

सिक्युरिटीज मार्केट ही अशी बाजारपेठ आहे ज्यात कंपन्या गुंतवणूकदारांना इक्विटी शेयर्स, डेब्ट सिक्युरिटीज, डेरिव्हेटिव्हज, म्युच्युअल फंड्स सारख्या सिक्युरिटीज देऊन निधी गोळा करतात आणि या मार्केटमधील गुंतवणूकदार वेगवेगळ्या प्रकारच्या सिक्युरिटीज (शेयर्स, बॉन्ड्स इ.) खरेदी किंवा विक्री करू शकतात. एकदा शेयर्स (किंवा सिक्युरिटीज) लोकांना जारी झाल्यानंतर कंपनीने त्या शेयर्सना (किंवा सिक्युरिटीजना) मान्यताप्राप्त स्टॉक एक्सचेंजमध्ये सूचीबद्ध करणे आवश्यक असते. सिक्युरिटीज मार्केट हा भांडवली बाजाराचा एक भाग आहे.



सिक्युरिटीज मार्केटचे प्राथमिक कार्य म्हणजे ज्यांना गरज आहे त्यांना गुंतवणूकदारांची बचत वाटप करणे. हे तेव्हाच शक्य होईल जेव्हा गुंतवणूकदार त्याच्या पैशाची आवश्यकता असलेल्या कंपन्या/संस्थांच्या सिक्युरिटीजमध्ये गुंतवणूक करेल आणि त्यानंतर गुंतवणूकदाराला व्याज, लाभांश, भांडवल वृद्धि, बोनस, इत्यादी मिळण्याचा हक्क असेल. अशा प्रकारच्या गुंतवणूकीमुळे देशाच्या आर्थिक विकासास हातभार लागत आहे.




सिक्युरिटीज मार्केटचे दोन स्वतंत्र आणि अविभाज्य विभाग आहेत, ज्यांचा खाली उल्लेख आहेः

**सिक्युरिटीज मार्केट**

- ०१ प्राथमिक बाजार
  - ०१ उद्देश्य : निधी गोळा करणे
  - ०२ आयपीओ म्हणजे इनीशियल पब्लिक ऑफर द्वारे नवीन सिक्युरिटीज जारी करण्याचा यात समावेश आहे.
- ०२ द्वितीयक (सेकेंडरी) बाजार
  - ०१ उद्देश्य : भांडवलात वृद्धि
  - ०२ जनतेला ऑफर केल्या गेलेल्या सिक्युरिटीजची निरंतर ट्रेडिंग करण्याचा यात समावेश आहे.

# ३

## प्राथमिक बाजार आणि द्वितियक बाजार




प्राथमिक बाजार (प्रायमरी मार्केट) :- प्राथमिक बाजारास नवीन इश्यू बाजार सुद्धा म्हटले जाते, जिथे कंपन्या/संस्था नवीन सिक्युरिटीज (शेयर, डिबेंचर्स, बाँड्स, इ.) जारी करुन लोकांकडून निधी गोळा करतात.

सिक्युरिटीज मार्केटचे दोन परस्परावलंबी व अविभाज्य विभाग आहेत, जे पुढीलप्रमाणे आहेत :-

अ) कॉर्पोरेट हस्ती (कंपन्या), जी विशेषतः इक्विटी साधन (शेयर) व डेब्ट साधन (बाँड्स, डिबेंचर्स इ. जारी करते.

ब) सरकार (केंद्रीय व राज्य), जी डेब्ट प्रतिभूती (डेब्ट सिक्युरिटीज आणि ट्रेजरी बिल्स) जारी करते.

### प्राथमिक बाजारात केल्या जाणाऱ्या इश्यूंचे प्रकारः

#### अ पब्लिक इश्यूः



सर्वसाधारण लोकांना सिक्युरिटीज दिल्या जातात आणि कोणीही त्यासाठी अर्ज करु शकतो. इक्विटी शेयर्सच्या पब्लिक इश्यूचे वर्गीकरण खालीलप्रमाणे केले जाऊ शकते.

**I. इनीशियल पब्लिक ऑफर (आयपीओ):**

ज्यामध्ये कंपनीकडून शेयर्सची पहिली पब्लिक ऑफर गुंतवणूकदारांना दिली जाते. आयपीओ निम्न स्वरुपात असू शकतातः

- **शेयर्सचे फ्रेश इश्यू** जेथे  कंपनी सार्वजनिक गुंतवणूकदारांना नवीन शेयर्स जारी करते. अशा प्रकरणात, इश्यू ज्या उद्देश्यासाठी केला आहे त्यात गुंतवणूकदारांचे पैसे गुंतवण्यात येतील .

- **ऑफर फॉर सेल** मध्ये सध्याचा भागधारक, जसे की प्रवर्तक (प्रमोटर) किंवा आर्थिक संस्था किंवा इतर कोणतीही व्यक्ती, जनतेला शेयर ऑफर करतात.

## II. फॉलो ऑन पब्लिक ऑफर (एफपीओ):

ही ऑफर जारीकर्ता किंवा कंपनीकडून देण्यात येते, जिने यापूर्वी आयपीओ जारी केला आहे आणि जनतेला नवीन सिक्युरिटीज देत आहेत.

## ब प्रेफरेंशियल इश्यू:



अशा प्रकारच्या इश्युमध्ये, गुंतवणूकदारांच्या एका निर्धारित गटाला जसे की प्रवर्तक, धोरणात्मक गुंतवणूकदार, कर्मचारी इत्यादींना सिक्युरिटीज दिल्या जातात.

## क राइट्स इश्यू:



जेव्हा एखादी कंपनी आपल्या विद्यमान भागधारकांना सध्याच्या भागधारकांच्या प्रमाणात नव्याने जारी केलेल्या शेयर्समध्ये गुंतवणूक करण्याचा अधिकार देते तेव्हा त्यास राइट् इश्यू म्हटले जाते.

## ड बोनस इश्यू:



जेव्हा विद्यमान भागधारकांना त्यांच्या सध्याच्या शेयर्सच्या प्रमाणात अतिरिक्त शुल्क न आकारता शेयर्स दिले जातात तेव्हा त्यास बोनस इश्यू म्हणतात.

सर्वसामान्यांकडून निधी गोळा करण्यासाठी कंपन्यांनी सेबीकडे ऑफर डॉक्युमेंट दाखल करणे बंधनकारक आहे, ज्यास ड्राफ्ट रेड हेरिंग प्रॉस्पेक्टस असे म्हणतात. ऑफर डॉक्युमेंटमध्ये कंपनी, तिचे प्रवर्तक, प्रकल्प, आर्थिक स्टेटमेंट, निधी उभारण्याचा उद्देश, इश्युच्या अटींशी संबंधित माहिती आणि घोषणा असतात. प्रॉस्पेक्टसमध्ये कंपनीचा इतिहास, प्रवर्तकांचे तपशील, व्यवसायाचे मॉडेल, कंपनीचा आर्थिक इतिहास, व्यवसायातील जोखीम, निधी उभारण्याचा उद्देश, इश्युच्या अटी आणि अशा अन्य समाविष्ट माहिती गुंतवणूकदारांना कंपनीमध्ये गुंतवणूकीबद्दल योग्य निर्णय घेण्यास मदत करतात. प्राथमिक बाजारात जारी केलेल्या सिक्युरिटीज जारी केलेल्या तारखेपासून मान्यताप्राप्त स्टॉक एक्सचेंजमध्ये ६ (सहा) व्यवहारी दिवसांपेक्षा कमी कालावधीत सूचीबद्ध केले जातात, ज्यानंतर त्या मान्यताप्राप्त स्टॉक एक्सचेंजवर सूचीबद्ध होतात, जेथे त्यांची व्यवहार होतात.

कंपनीने दिलेले शेयर्स डिमॅट खात्यात जमा केले जातात, जे सेबीच्या नोंदणीकृत डिपॉझिटरी पार्टिसिपंट (डीपी) ठेवीमध्ये ठेवली जातात.

भारतीय प्रतिभूति और विनिमय बोर्ड
Securities and Exchange Board of India

**द्वितीयक बाजार:** एकदा प्राथमिक बाजारात सिक्युरिटीज जारी झाल्यावर आणि स्टॉक एक्स्चेंजवर सूचीबद्ध झाल्यास गुंतवणूकदार त्या स्टॉक एक्सचेंजच्या माध्यमातून सिक्युरिटीज खरेदी व विक्री करू शकतात. स्टॉक एक्सचेंजचे दोन विभाग (सेगमेंट) आहेत- कॅश मार्केट सेगमेंट आणि डेरिवेटिव्ह मार्केट सेगमेंट.



# ४

## प्रतिभूती बाजारात मार्केट इन्फ्रास्ट्रक्चर संस्थान तसेच मार्केट मध्यस्थ इंटरमीडियरीज कोण आहेत?



**मार्केट इन्फ्रास्ट्रक्चर संस्थान:-** प्रतिभूती बाजारात व्यवहार करण्यासाठी (प्रतिभूती जारी, खरेदी व विक्री करण्यासाठी) स्टॉक एक्सचेंज, डिपॉजिटरीज तसेच क्लियरिंग कॉर्पोरेशन द्वारे इन्फ्रास्ट्रक्चर प्रदान केला जातो, ज्यास मार्केट इन्फ्रास्ट्रक्चर संस्थान (एमआयआय) च्या स्वरूपात ओळखले जाते. सेबी नोंदणीकृत एमआयआयची सूची पुढील लिंक वर उपलब्ध आहे.
https://www.sebi.gov.in/intermediaries.html.



**स्टॉक एक्सचेंज राष्ट्रव्यापी:-** संगणकीकृत पडद्याआधारित ट्रेडिंग प्लॅटफॉर्म प्रदान करतो, जो आपल्या मान्यताप्राप्त स्टॉक ब्रोकरांद्वारे किमान जोखमीत योग्य मूल्य निर्धारणावर प्रतिभूतींची खरेदी व विक्रीची सुविधा देतो. भारतात मान्यताप्राप्त एक्सचेंजची सूची (सेबीचे संकेतस्थळ) वर उपलब्ध आहे.
https://www.sebi.gov.in/stock-exchanges.html.

बीएसई लि. (बीएसई) व नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया (एनएसई) आणि मेट्रोपॉलिटन स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लि. (एमएसई) प्रमुख राष्ट्रव्यापी स्टॉक एक्सचेंज आहेत.

**क्लियरिंग कॉर्पोरेशन:-** स्टॉक एक्सचेंजच्या क्लियरिंग कॉर्पोरेशनचे मुख्य काम स्टॉक एक्सचेंजवर क्रियान्वित केल्या गेलेल्या व्यवहारांचे सेटलमेंट सुनिश्चित करणे आहे. दुसऱ्या शब्दांत, क्लियरिंग कॉर्पोरेशन हमी देतात की प्रत्येक खरेदकर्त्या खरेदी केलेल्या सिक्युरिटीज त्यांना मिळतील आणि सिक्युरिटीजच्या प्रत्येक विक्रेत्याने त्यांच्या विक्री केलेल्या सिक्युरिटीजसाठी पैसे मिळतील.

**डिपॉजिटरीज:** डिपॉजिटरीज एक संस्था आहे, जी गुंतवणूकदारांच्या प्रतिभूतींना डिमटेरियलाज्ड/इलेक्ट्रॉनिक स्वरूपात ठेवते आणि मान्यताप्राप्त डिपॉजिटरी पार्टिसिपंट्स (डीपी) द्वारे गुंतवणूकदारांना डीमॅट सेवा प्रदान करते. सेबीकडे दोन डिपॉजिटरीज नोंदणीकृत आहेत, ज्यांपैकी एक आहे नॅशनल सिक्युरिटीज डिपॉजिटरीज लि. (एनएसडीएल) आणि दूसरी आहे सेंट्रल डिपॉजिटरी सर्व्हिसेस ऑफ (इंडिया) लि. (सीडीएसएल). प्रत्येक डिपॉजिटरी अन्वये नोंदणीकृत डिपॉजिटरी पार्टिसिपंट्स (डीपीएस) आहेत, जे गुंतवणूकदारांना डीमॅट खाते, इत्यादि उघडणे व त्याची देखभाल करण्यासारख्या विभिन्न सेवा प्रदान करतात.

**मार्केट इंटरमीडियरीज (मार्केट मध्यस्थ) :-** प्राथमिक व द्वितीयक बाजाराच्या कार्यरत व्यवहारात महत्वपूर्ण भूमिका बजावतात. मार्केट इंटरमीडियरीज प्रतिभूतींची खरेदी व विक्रीचे व्यवहार क्रियान्वित करणे, प्रतिभूतींच्या वितरणाचे व्यवहार करणे व प्रतिभूतींच्या व्यवहाराच्या संबंधित माहिती प्रदान करण्याच्या व्यवसायात संलग्न आहे. कित्येक महत्वपूर्ण इंटरमीडियरीज स्टॉक ब्रोकर, डिपॉजिटरी पार्टिसिपंट्स, मर्चंट बँकर्स, शेयर व ट्रांसफर एजंट, रजिस्ट्रार्स, इत्यादि आहेत. सर्व मध्यस्थ सेबीकडे नोंदणीकृत आहेत, जे गुंतवणूकदारांच्या सुरक्षेसाठी निर्धारित नियमांचे पालन करतात. सेबीच्या अधिकृत मार्केट मध्यस्थांची सूची तुम्ही पुढील संकेत स्थळावरून मिळवू शकताः
https://www.sebi.gov.in.




## गुंतवणूकीच्या मूलभूत बाबी


प्रतिभूती बाजारात गुंतवणूकीची सुरुवात करण्यापूर्वी तुम्हांला तुमच्या गुंतवणूकीचे लक्ष्य, उद्देश्य व जोखमेला (ज्या मर्यादित सीमेपर्यंत तुम्ही जोखिम घेण्यास तयार आहात) समजण्यासह ओळखण्याची आवश्यकता आहे. प्रत्येक गुंतवणूकीचा निर्णय तुमची आवश्यकता व पसंतीनुसार असायला हवा. उदा. तुमची इच्छा सतत परतावा (रिटर्न्स) देणाऱ्या सुरक्षित साधनांमध्ये गुंतवणूक करण्याची आहे किंवा थोडी अधिक जोखिम घेऊन अधिक नफा देणाऱ्या साधनांमध्ये गुंतवणूक करण्याची आहे.



एकदा तुम्ही तुमचे लक्ष्य व जोखमीचा निर्णय करता, तेव्हा कृपया कोणत्या साधनात किती रक्कम गुंतवणार आहात, याची पडताळणी करून घ्या. प्रत्येक गुंतवणूकदाराची जोखिम पत्करण्याची क्षमता वेगवेगळी असते व गुंतवणूकदाराच्या वयासह त्याच्या लक्ष्यावर सुद्धा अवलंबून असते.



गुंतवणूकदारांना त्यांचे हक्क, कर्तव्ये आणि काय करावे व काय करू नये याबद्दल चांगले ज्ञान असले पाहिजे, ज्याची माहिती सेबी आणि स्टॉक एक्सचेंजच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे तसेच या पुस्तिकेच्या परिशिष्ट-१ मध्ये याबद्दल माहिती दिलेली आहे त्याचबरोबर गुंतवणूकदारांच्या जबाबदाऱ्या व कर्तव्ये परिशिष्ट-२ मध्ये जोडली गेली आहेत.



स्टॉकमध्ये गुंतवणूक करण्यापूर्वी गुंतवणूकदारांना सर्व प्रकारच्या माहिती मिळाल्या पाहिजेत. त्यांनी कंपनीशी संबंधित सर्व माहिती काळजीपूर्वक वाचली पाहिजे जसे की त्यांचे प्रवर्तक, प्रकल्पांचे तपशील, आर्थिक स्टेटमेंट, इत्यादी.

सिक्युरिटीज मार्केटमध्ये गुंतवणूक करण्यासाठी गुंतवणूकदार सेबीकडे नोंदणीकृत कोणत्याही गुंतवणूक सल्लागाराशी संपर्क साधू शकतात. सेबी नोंदणीकृत गुंतवणूक सल्लागारांच्या यादीसाठी या लिंकवर क्लिक करा.
https://www.sebi.gov.in.



तथापि, गुंतवणूकदारांनी नोंदणी नसलेल्या गुंतवणूक सल्लागारांकडून गुंतवणूकीचा सल्ला घेण्यापासून सावधानता बाळगावी. तपशीलांसाठी आपल्याला या पुस्तिकेचा परिशिष्ट-३ पहा.

# ५

## प्रतिभूती बाजारात गुंतवणूक करण्यात असणारे प्रमुख जोखिमः

बाजार जोखिम किंवा सिस्टमॅटिक जोखिमः गुंतवणूकदारास आर्थिक बाजाराच्या संपूर्ण प्रदर्शनाला प्रभावित करणाऱ्या कारकांपासून नुकसान होऊ शकते.

असिस्टमॅटिक जोखिमः अनियमित जोखमेला विशिष्ट कंपनी किंवा इंडस्ट्री सह जोडलेल्या अनिश्चिततेच्या स्वरुपात वर्णित केले जाऊ शकते.

चलनवाढीची जोखिमः चलनवाढीच्या जोखमेला खरेदी क्षमता जोखिम सुद्धा म्हटले जाते.

तरलता जोखिमः कोणत्याही नुकसानास रोखणे किंवा कमी करण्याकरिता त्वरित गुंतवणूकीची खरेदी वा विक्री करता येत नाही, तेव्हा तरलता जोखिम उत्पन्न होते. तुम्ही आपल्या गुंतवणूकीत विविधता आणण्याद्वारे तरलता जोखमेस बऱ्याच हद्दीपर्यंत कमी करू शकता.

व्यवसायाची जोखिमः बाजारपेठ किंवा आर्थिक परिस्थिती प्रतिकूल असल्यामुळे कंपनीचे संचालन बंद करावे लागू शकते. अशा जोखीमेला व्यावसायिक धोका म्हणतात.

भावचंचलतेची जोखिम (व्होलटिलिटी रिस्क): भावचंचलतेची जोखीम तिला म्हणतात जेव्हा कंपनीच्या शेयर्सच्या मूल्यात चढ-उतार होते.

चलन जोखिमः जेव्हा कोणताही गुंतवणूकदार विदेशी चलन किंवा विदेशी चलन व्यापारामध्ये गुंतवणूक करतो, तेव्हा विदेशी चलनाच्या किंमतीतील चढ-उतारामुळे होणाऱ्या नुकसानाच्या संभाव्य जोखमेस चलन जोखिम म्हटले जाते.

## ६

## जोखमेला कमी कसे केले जाते?

गुंतवणूकदार विभिन्न मार्गांनी जोखमेला कमी करु शकतात. गुंतवणूकदार विभिन्न क्षेत्रात किंवा कंपन्यांमध्ये गूंतवणूक करुन आपल्या पोर्टफोलियोमध्ये वैविध्य आणून जोखिम कमी करू शकतात.

## खाते उघडण्याची प्रक्रिया

## ७

## प्रतिभूती बाजारात गुंतवणूकीसाठी आवश्यक अटी

इक्विटी शेयर्समध्ये गुंतवणूक करण्यासाठी गुंतवणूकदारास तीन खाते (बँक खाते, ट्रेडिंग खाते, डीमॅट खाते) उघडण्याची आवश्यकता असते:

बँक अकाउंट | ट्रेडिंग खाते | डीमॅट खाते

अ) बचत खाते (बँक अकाउंट)

ब) स्टॉक एक्सचेंजवर सिक्युरिटीज खरेदी व विक्रीसाठी सेबीकडे नोंदणीकृत स्टॉक एक्सचेंजचे ट्रेडिंग खाते किंवा ब्रोकिंग खाते. ही खाती स्टॉक एक्सचेंजवर सिक्युरिटीज खरेदी करण्यासाठी किंवा विकण्यासाठी वापरली जातात. ट्रेडिंग खाते उघडण्यासाठी तुम्हाला खाते उघडण्याचा फॉर्म भरावा लागेल व तुमच्या 'नो यूअर क्लायंट' (केव्हायसी) कागदपत्रावर सही करावी लागेल.

**खाते उघडताना फॉर्म भरताना खालील खबरदारी घ्यावी:**

- विविध एक्सचेंजवर व्यापार करण्यासाठी आपली पसंती व्यक्त करताना आपण स्वाक्षरी केली पाहिजे.
- आपण आपल्या खात्यांना लागू असलेले सर्व शुल्क/फी/दलाली विचारात घ्यावी आणि तिची नोंद ठेवली पाहिजे.
- याशिवाय एखाद्याला विविध एक्सचेंज आणि सेगमेंट्स (कॅश, एफएंडओ, चलन डेरिव्हेटिव्ह्ज किंवा इतर कोणत्याही विभागात) व्यापार करण्यासाठी आपले प्राधान्य दर्शवावे लागते. डेरिव्हेटिव्ह्जमध्ये व्यापार करण्यासाठी डेरिव्हेटिव्ह्जची उत्पादने समजणे आवश्यक आहे.
- तथापि, रनिंग खाती सुविधा, पावर ऑफ ॲटर्नी क्रियान्वित करणे. इ. सारख्या अतिरिक्त सुविधांचा लाभ घेण्यासाठी तुम्हाला भविष्यात कोणत्याही प्रकारचा वाद टाळण्यासाठी स्टॉक ब्रोकरला विशेष अधिकार द्यावा लागेल.
- खाते उघडताना तुम्हाला फॉर्ममध्ये तुमचा ई-मेल आणि मोबाइल क्रमांक द्यावा लागतो. दलाल आणि स्टॉक एक्सचेंज हे आपल्यासाठी महत्त्वपूर्ण असलेल्या व्यापारा संबंधी अपडेट ठेवण्यासाठी याचा वापर करतात.
- आपण आपल्या रेकॉर्डसाठी खाते उघडण्याच्या फॉर्मची एक प्रत विचारली पाहिजे.

## ८

## खाते उघडण्याची प्रक्रिया: नो युअर क्लायंट (केव्हायसी) प्रक्रिया:

डिमॅट/ट्रेडिंग/बँक खाते उघडतेवेळी गुंतवणूकदाराला नो युअर क्लायंट (केव्हायसी) कागदपत्रे दाखल करायची असतात. चला पाहूया की केव्हायसी म्हणजे काय आणि याची आवश्यकता का आहे?

मनी लॉंडरिंग ॲक्ट २००२ तसेच याअन्वये बनवलेल्या नियमांतर्गत केव्हायसी पालन अनिवार्य आहे. डिमॅट/बँक/ट्रेडिंग खाते उघतेवेळी ग्राहकांनी ओळखपत्र व राहत्या घराचा पत्ता दर्शवणारा पुरावा वैध कागदपत्रांसह सुपुर्द करावा लागतो. ही कागद पत्रे केव्हायसीकरिता आवश्यक आहेत. गुंतवणूक पॅन कार्ड/युआयडीएआय - आधार/पासपोर्ट/मतदार ओळखपत्र/वाहन चालवण्याच्या परवाना इ. द्वारे आपली ओळख व राहत्या घराचा पत्ता यांचा पुरावा देऊ शकतो.
एकदा केव्हायसी अर्ज दाखल केल्यावरच एक यूनिक केव्हायसी आयडेंटिफिकेशन क्रमांक (केआयएन) मिळतो आणि एसएमएस/ई-मेल द्वारे ग्राहकास सूचित केले जाते. केव्हायसी प्रक्रिया एक वेळच आहे आणि ही सर्व मध्यस्थांमध्ये वैध आहे. तुम्हांला प्रतिभूती बाजारात अजून एका मध्यस्थासह खाते उघडतेवेळी या प्रक्रियातून जावे लागत नाही.



### ई-केव्हायसी

गुंतवणूकदार युआयडीएआय - आधार/डिजी लॉकरचा उपयोग करून ई-केव्हायसी द्वारे केव्हायसी प्रक्रिया पूर्ण करू शकतात.

- स्टॉक ब्रोकरच्या संकेतस्थळावर खाते उघडण्यासाठी माहिती भरा.
- ओळखपत्र व रहिवाश्याचा दाखला ही आवश्यक कागदपत्रे स्कॅन करून सुपुर्द करा.
- व्हिडिओ कॉल द्वारे इन पर्सन व्हेरिफिकेशन (आयपीव्ही) प्रक्रिया पूर्ण करा.
- कागदपत्रांवर डिजिटल सही करा.
- खाते सक्रिय होईल.

**सल्ला:**

- स्वाक्षरी करण्यापूर्वी सर्व कागदपत्रांना वाचा व समजून घ्या.
- कोणत्याही रिक्त कागदावर स्वाक्षरी करु नका.
- खाते उघडतेवेळी परिशिष्ट मध्ये सांगितलेल्या 'काय करावे व काय नरू नये' चा संदर्भ घ्या.
- तुमच्या खात्यातील व्यवहारांच्या संबंधित सर्व एसएमएस तसेच ईमेल अलर्ट प्राप्त करण्यासाठी बँक, डिपॉझिटरी पार्टिसिपंट्स आणि स्टॉक ब्रोकरकडे आपला भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल अॅड्रेस नोंधणीकृत करा.

# ९

# बेसिक सर्व्हिसेस डीमॅट अकाऊंट (बीएसडीए)

### बेसिक सर्व्हिसेस डीमॅट अकाऊंट (बीएसडीए):

बेसिक सर्व्हिसेस डिमटेरिअलाइझ्ड अकाऊंट त्या व्यक्तींना दिले जाते, ज्यांच्याकडे फक्त एक डिमॅट खाते आहे आणि ज्यांची गैर डेब्ट सिक्युरिटीज आणि डेब्ट सिक्युरिटीजची होल्डिंग रु. २ लाख हून अधिक नसेल.

| सिक्युरिटीजचे प्रकार | होल्डिंग्सची स्लॅब किंमत | शुल्क |
|---|---|---|
| गैर डेब्ट सिक्युरिटीज साठी | ५०,००० रु. पर्यंत | एएमसी नाही |
| | ५०,००१ रु. ते २,००,००० रु. पर्यंत | १०० रु. पर्यंत |
| डेब्ट सिक्युरिटीज साठी | १,००,००० रु. पर्यंत | एएमसी नाही |
| | १,००,००१ रु. ते २,००,००० रु. पर्यंत | १०० रु. पर्यंत |

याबाबतीत नवीन नियमांसाठी कृपया सेबी किंवा डिपॉजिटरीच्या संकेतस्थळाला भेट द्या.

वरील तीन खात्यांच्या (बँक खाते, डीमॅट खाते व ट्रेडिंग खाते) संयोजनास 'एका खात्यात तीन खाती' (थ्री इन वन अकाऊंट) या स्वरूपात संदर्भित केले जाते. गुंतवणूकदार वेगवेगळ्या डिपॉझिटरी पार्टिसिपंट्स/ब्रोकर्स/संस्थांकडे वरील तीन खाते वेगवेगळे उघडू शकतात किंवा एकाकडेच सुविधा असल्यास ही तीनही खाती उघडू शकतात.

सेबीमध्ये नोंदणीकृत स्टॉक ब्रोकर्स तसेच डिपॉजिटरी पार्टिसिपंट्सची सूची सेबीचे अधिकृत संकेतस्थळ - (www.sebi.gov.in) वा संबंधित स्टॉक एक्सचेंज किंवा डिपॉजिटरीच्या संकेतस्थळांवरुन प्राप्त होऊ शकते.

# १०

## पावर ऑफ ॲटर्नी




पावर ऑफ ॲटर्नी खूपच महत्त्वाचे कागदपत्र आहे, कारण तुमचे खाते व भांडवल जमा करणे तसेच त्याचा उपयोग करण्याचा अधिकार दुसऱ्या व्यक्तीला देण्याची क्षमता यात आहे. सिक्युरिटीज मार्केट मधे स्टॉक ब्रोकर आणि/किंवा डिपॉझिटरी पार्टिसिपंट्सना ग्राहकांचे डिमॅट खाते आणि बँक खाते चालवण्याची अधिकार दिला गेला आहे. हे करण्यामागचा उद्देश्य शेयर्सची डिलीव्हरी तसेच पैशांचे पे-ईन/पे-आउट सोप्या मार्गाने करणे आहे. सेबीच्या मार्गदर्शिकेच्या अंतर्गत स्टॉक ब्रोकर/डिपॉझिटरी पार्टिसिपंट्सच्या बाजून विशेष स्वरूपात पावर ऑफ ॲटर्नी बनवण्यात येते.

सेबी मार्गदर्शिका सांगते की ग्राहकांना पावर ऑफ ॲटर्नी करणे अनिवार्य नाही. ही त्यांची स्वैच्छिक बाब आहे. जर ग्राहकांना वाटले की पावर ऑफ ॲटर्नी करून त्यांचा फायदा आहे, तर ते बनवू शकतात तसेच कोणत्याही क्षणी बंद सुद्धा करू शकतात.

ग्राहकाने पावर ऑफ ॲटर्नी दिली नसेल तरीही जर स्टॉक ब्रोकरने ग्राहकाच्या खात्यात कोणत्याही कारणाशिवाय शेयर्स हस्तांतरण केल्यास ग्राहक या विषयी स्टॉक ब्रोकरला जाब विचारु शकतो. प्रतिसाद न मिळाल्यास किंवा समाधानकारक उत्तर न मिळाल्यास ग्राहक ही बाब डिपॉझिटरी/एक्सचेंजकडे मांडू शकतो.

मार्गदर्शक
https://www.sebi.gov.in/

# ११

## नामांकन (नॉमिनेशन)

नामांकन एक अशी सुविधा आहे, जिच्याद्वारे एक वैयक्तिक गुंतवणूकदार इतर व्यक्तीस नामित करू शकतो, जो गुंतवणूकदाराच्या मृत्युच्या स्थितीत त्याच्याद्वारे धारित प्रतिभूती किंवा रिडम्प्शन प्रक्रियेसाठी (म्युच्युअल फंड यूनिट्सच्या संबंधी) दावा करू शकतो.



## मी सिक्युरिटीज मार्केटमधे कशी गुंतवणूक करू?

# १२

## प्राथमिक (प्रायमरी) बाजाराद्वारे गुंतवणूक

जेव्हा एक इश्युअर कंपनी पब्लिक ऑफर द्वारे सामान्य व्यक्तींना शेयर जारी करतो, तेव्हा तुम्ही आवश्यक अर्ज दाखल करून शेयर्ससाठी अर्ज करू शकता. सिक्युरिटीज जारी करण्यासाठी इश्यूअर कंपनीला अटी, नियमांचे पालन करावे लागते. निर्धारित अटी तसेच नियमांच्या अनुसार शेयर्सचे अलॉटमेंट केले जाते. अलॉट केले गेलेले शेयर डिपॉजिटरी पार्टिसिपंट्स (डीपी) सह बनवलेल्या तुमच्या डिमॅट खात्यात जमा होतील. जर एक गुंतवणूकदाराची इच्छा सिक्युरिटीजला भौतिक स्वरूपात ठेवण्याची आहे, तर तो अर्जाचा फॉर्म भरते वेळी त्यात निर्दिष्ट करू शकतो. सिक्युरिटीजचे अलॉटमेंट डिमॅट स्वरुपात होईल आणि त्यानंतर गुंतवणूकदार त्याला भौतिक स्वरुपात रुपांतरित करु शकतो. इश्यू बंद झाल्याच्या सहा दिवसांच्या आत, या शेयर्स मध्ये ट्रेडिंग करण्यासाठी हे शेयर मान्यताप्राप्त स्टॉक एक्सचेंज वर सूचीबद्ध केले जातात.



**कृपया हे ध्यानात ठेवाः**
नवीन सेबी दिशानिर्देशांनुसार तुम्ही शेयर सर्टिफिकेटच्या रुपात फिजिकल फॉर्म किंवा डिमॅट फॉर्म मध्ये सिक्युरिटीजची होल्डिंग ठेवू शकता. खरंतर, १ एप्रिल २०१९ या प्रभावी तारखेपासून सिक्युरिटीज डिमॅट फॉर्म मध्येच हस्तांतरित केल्या जातील. म्हणून हा सल्ला दिला जातो की एक डिमॅट खाते उघडा आणि डिमॅट फॉर्म मध्येच सर्व सिक्युरिटीज ठेवा. कायदेशीर उत्तराधिकाऱ्यांस शेयर हस्तांतरित करतेवेळी हा नियम लागू होत नाही.

# १३

## प्राथमिक बाजारात गुंतवणूकीची प्रक्रिया




प्राथमिक बाजारात पब्लिक ऑफर/इश्यूच्या वेळी तुम्ही अर्जाचा फॉर्म भरुन थेट कंपनीचे शेयर्स खरेदी करु शकता आणि सर्व सामान्य लोकांसाठी इश्यू खुला असेपर्यंत पेमेंट करु शकता. अर्जाच्या फॉर्म मध्ये तुम्हांला तुमचे नाव, पत्ता, अर्ज केलेल्या शेयर्सची संख्या, बँक खात्याचे संपूर्ण विवरण, डिमॅट खाते ज्यात शेयर जमा केले जातात इ. विवरण भरावे लागतात.




जो गुंतवणूकदार आयपीओ मध्ये गुंतवणूक करण्याची इच्छा बाळगतो, तो एएसबीए (आस्बा) द्वारे अर्ज करु शकतो. त्यानंतर गुंतवणूकदारास ऑनलाइन फॉर्म भरावा लागेल, ज्यानंतर आयपीओच्या लाँचिंग तारखेच्या निर्धारित बीडिंग रेंजमध्येच आपल्या पसंतीच्या शेयर्समध्ये बीड करु शकतील. त्यानंतर गुंतवणूकदाराच्या बँक खात्यात बीड केली गेलेली रक्कम ब्लॉक होऊन जाते. आयपीओच्या संपूर्ण सूचीबद्धतेच्या प्रकियेसाठी ६ (सहा) व्यवहारी दिवस लागतात. गुंतवणूकदार ज्यांना शेयर्स इश्यू केले गेले आहेत, त्यांना शेयर्स डिमॅट खात्यात मिळतात व यासाठीची रक्कम बँक खात्यातून कापली जाते. कोणत्याही गुंतवणूकदाराला शेयर अलॉट केले गेले नसतील, तर अशा प्रसंगी त्यांच्या खात्यातील ब्लॉक केलेली रक्कम मुक्त केली जाते.

### विशेष खबरदारी:

- प्राथमिक बाजारात गुंतवणूक करण्यापूर्वी प्रोस्पेक्टस/रेड हेरिंग प्रॉस्पेक्टस/ऑफर कागदपत्रे काळजीपूर्वक वाचा.
- आयपीओ मध्ये शेयर्स साठी बीड करते वेळी किंमतीची मर्यादा तसेच शेयर्सची संख्या काळजीपूर्वक लिहा.
- आयपीओ साठी अर्ज करते वेळी तुमच्या द्वारे केली गेलेली बीड्स लक्षात ठेवा.
- बाजार भावनेच्या आधारावर गुंतवणूक करु नका, तर कंपनी विषयी विश्लेषण केल्यानंतरच गुंतवणूक करा.

# १४

## एप्लिकेशन सपोर्टेड बाय ब्लॉक्ड अमाउंट (आस्बा)

गुंतवणूकदार सिक्युरिटीजसाठी आस्बामार्फत आयपीओसाठी अर्ज करू शकतात. आस्बा मध्ये, ज्या शेयर्ससाठी अर्ज केले आहेत त्यांची रक्कम आपल्या खात्यात अवरोधित (ब्लॉक) केली गेली आहे, परंतु वाटप होईपर्यंत ती तुमच्या खात्यात राहील. समभागांचे वाटप झाल्यावर आपल्या खात्यातून पैसे डेबिट केले (वजा केले) जातात. वाटप न झाल्यास परतावा आवश्यक नसतो आणि अवरोधित निधीवर व्याज चालूच राहते. म्हणूनच, आयपीओमध्ये अर्जासाठी धनादेश पाठविण्याऐवजी तुम्ही फक्त आस्बामार्फत अर्ज करू शकता. ही सुविधा निवडलेल्या बँकांच्या काही शाखांद्वारे उपलब्ध करुन देण्यात आली आहे. अशा शाखांची यादी सेबीच्या संकेतस्थळावर पाहता येईल. गुंतवणूकदार आता पेमेंट सिस्टम म्हणून युनिफाइड पेमेंट इंटरफेस (यूपीआय) वापरून आयपीओमध्ये गुंतवणूक करु शकतात. यूपीआय वापरण्याच्या प्रक्रियेचे परिशिष्ट - ४ मध्ये वर्णन केले आहे.



# १५

## द्वितीयक बाजाराद्वारे गुंतवणूक

स्टॉक ब्रोकरसह एकदा खाते उघडल्यानंतर तुम्ही मान्यताप्राप्त स्टॉक एक्सचेंज, जिथे शेयर सूचीबद्ध तसेच ट्रेड केले जातात, तेथे स्टॉक ब्रोकर द्वारे शेयर्सची खरेदी तसेच विक्री करु शकता. तुम्ही ब्रोकरच्या संकेतस्थळावर जाऊन ऑनलाइन ट्रेडिंग खाते, ब्रोकरची मोबाइल ट्रेडिंग ॲप आणि फोनचा वापर करु शकता किंवा ब्रोकरच्या कार्यालयाची भेट घेऊन सिक्युरिटीजच्या खरेदी तसेच विक्री करिता ऑर्डर देऊ शकता.



आॅर्डर देण्याचे प्रकार:-




**खबरदारी:**

- सेबी नोंदणीकृत स्टॉक ब्रोकर वा अधिकृत व्यक्तीद्वारेच शेयर्सची खरेदी वा विक्री करा.
- द्वितीयक बाजारात ट्रेडिंगच्या वेळी तुमच्या द्वारे ब्रोकरला दिल्या गेलेल्या ऑर्डर्सचा रेकॉर्ड ठेवा

# १६

## ट्रेडिंग दिवस तसेच ट्रेडिंग आणि सेटलमेंट चक्र

शनिवार, रविवार आणि स्टॉक एक्सचेंज द्वारे घोषित सुट्ट्यांव्यतिरिक्त आठवड्याच्या सर्व दिवशी ट्रेडिंग केली जाते. शेयर्सच्या खरेदी संबंधी , गुंतवणूकदाराला संबंधित सेटलमेंटकरिता पे-इन दिवसाआधी आपल्या स्टॉक ब्रोकरच्या बँक खात्यात पेमेंट करावे लागेल. अशा प्रकारे, शेयर्सच्या विक्री संबंधी, गुंतवणूकदाराला संबंधित सेटलमेंटकरिता पे-इन दिवसाआधी ब्रोकरच्या डिमॅट खात्यात शेयर्सची डिलीवरी करावी लागेल.



पे-इन तसेच पे-आउट दिवस काय आहे?

ब्रोकर ज्या दिवशी एक्सचेंजच्या क्लियरिंग कॉर्पोरेशनला पेमेंट करतो किंवा सिक्युरिटीजची डिलीवरी करतो, त्या दिवसाला पे-इन दिवस म्हटले जाते. ज्या दिवशी क्लियरिंग कॉर्पोरेशन ब्रोकरला पेमेंट करतो किंवा सिक्युरिटीजची डिलीवरी करतो, त्या दिवसाला पे-आउट दिवस म्हटले जाते. सेटलमेंट चक्र टी+२ रोलिंग सेटलमेंटच्या आधारावर १एप्रिल २००३ च्या पासून प्रभावी आहे (ज्यात टी म्हणजे ट्रेडिंग दिवस) उदाहरणार्थ, सोमवारी क्रियान्वित केले गेलेले

व्यवहार बुधवारी सेटल केले जातात. (ट्रेडिंग दिवसापासून दोन व्यवहारी दिवसांना (वर्किंग डेज) ध्यानात ठेवून). स्टॉक एक्सचेंज हे सुनिश्चित करतात की पैसे तसेच सिक्युरिटीज टी+२ दिवसांच्या आधारावर पे-इन तसेच पे-आउट केले गेले असतील.

**पे-इन:** पैसे/सिक्युरिटीजचे पे-इन म्हणजे ब्रोकरच्या खात्यातून पैसे/सिक्युरिटीज एक्सचेंजच्या खात्यात हस्तांतरित करणे.

**पे-आउट:** पैसे/सिक्युरिटीजचे पे-आउट म्हणजे पैसे/सिक्युरिटीज एक्सचेंजच्या खात्यातून ब्रोकरच्या खात्यात हस्तांतरित करणे.

**ही सावधानी बाळगा:**

- हे सुनिश्चित करा की पे-इन/पे-आउट दिनी सेटलमेंटच्या आधी तुमच्या बँक/डिमॅट खात्यात पैसे/सिक्युरिटीज पुरेशा प्रमाणात आहेत.
- पुरेशा प्रमाणात पैसे/सिक्युरिटीज उपलब्ध नसल्यास दंड भरावा लागेल, ज्यामुळे गुंतवणूकदारास नुकसान सहन करावे लागेल.

# १७

## कॉंट्रॅक्ट नोट

कॉंट्रॅक्ट नोट स्टॉक ब्रोकर द्वारे केल्या गेलेल्या व्यवहाराचा पुरावा आहे तसेच कायदेशीर कागदपत्र आहे, ज्यामध्ये सिक्युरिटीजची खरेदी/विक्री केली असेल, व्यवहाराचे मूल्य, व्यवहाराची वेळ, ब्रोकरेज इत्यादि व्यवहार विवरण समाविष्ट असतात. कॉंट्रॅक्ट नोट भौतिक किंवा इलेक्ट्रॉनिक फॉर्म मध्ये जारी केले जातात. तुम्ही जर इलेक्ट्रॉनिक कॉंट्रॅक्ट नोट निवडली असेल, तर स्टॉक ब्रोकरला तुमच्या ई-मेल आयडीचा तपशील द्यायचा असतो. अशी कॉंट्रॅक्ट नोट डिजिटल रुपात स्वाक्षरीकृत, गोपनीय तसेच कोणत्याही काटछाट शिवाय असली पाहिजे. गुंतवणूकदाराद्वारे अशा कॉंट्रॅक्ट नोट्सना भावी संदर्भात सुरक्षित ठेवले पाहिजे, कारण याचे अत्याधिक महत्व आहे, विशेषतः जर एखादा वाद उत्पन्न झाल्यास याची आवश्यकता भासू शकते.



**खबरदारी:**

- ट्रेड क्रियान्वित झाल्याच्या २४ तासांच्या आत स्टॉक ब्रोकर द्वारे कॉंट्रॅक्ट नोट जारी करायला हवी. कॉंट्रॅक्ट नोट मध्ये कोणत्याही विसंगतीच्या संदर्भात गुंतवणूकदारास त्वरित स्टॉक ब्रोकर सह चर्चा करायला हवी.
- बाजारात ऑर्डर देते वेळी कॉंट्रॅक्ट नोट मध्ये उल्लेखित तपशीलासह तुमच्या द्वारे ठेवल्या गेलेल्या रेकॉर्डची पुन्हा पडताळणी करावी. कोणत्याही विसंगतीच्या संदर्भात गुंतवणूकदाराने आपल्या ब्रोकरशी संपर्क साधावा.

ग्राहकाद्वारे देण्यात आलेल्या ऑर्डरचा पुरावा ठेवल्यानंतरच स्टॉक ब्रोकर ट्रेड क्रियान्वित करु शकतो.
असे ऑर्डर

- ग्राहक द्वारे लिखित वा स्वाक्षरीकृत,
- टेलिफोन रेकॉर्डिंग,
- अधिकृत ई-मेल वरुन पाठवलेला ई-मेल,
- इंटरनेट ट्रांजॅक्शन करिता लॉगिंग,
- मोबाइल फोन द्वारे पाठवलेल्या संदेशाचा रेकॉर्ड,
- कोणत्याही इतर कायदेशीर रुपातील साक्षांकित रेकॉर्ड असू शकतो.




# १८

## गुंतवणूकदारास एसएमएस आणि ईमेल सूचना

गुंतवणूकदार एसएमएस आणि ईमेल अलर्ट सुविधेची निवड करू शकतात, ज्याद्वारे त्यांना त्यांच्या ट्रेडिंग आणि डीमॅट खात्यात होणाऱ्या कोणत्याही व्यापार/व्यवहारासाठी विनामूल्य एसएमएस आणि ईमेल अलर्ट प्राप्त होतील. या सुविधेचा फायदा घेण्यासाठी गुंतवणूकदारांनी हे सुनिश्चित केले पाहिजे की त्यांचे मोबाइल नंबर आणि ईमेल आयडी शेअर केलेले आहेत आणि त्यांचे समभाग ब्रोकर आणि डिपॉझिटरी पार्टिसिपंट यांसह अपडेट केले आहेत.



# १९

## रनिंग खाते अधिकारिता

**सामान्यतः** ब्रोकर द्वारे व्यवहार (खरेदी/विक्री) यांचे सेटलमेंट पैसे/सिक्युरिटीजच्या माध्यमातून २४ तासांच्या आत केले जाते. तसे तुम्ही रनिंग खाते चालवण्याकरिता स्टॉक ब्रोकरला विशेष अधिकार देऊ शकता, ज्याने स्टॉक ब्रोकर एका वेगळ्या खात्यात तुमचे शेयर्स वा पैसे, जे पण असेल, ठेवू शकतो.

रनिंग खात्यात ठेवलेले शेयर्स वा पैसे भावी व्यवहारांच्या सेटलमेंटकरिता वापरण्याची सुविधा देतात, ज्यामुळे रनिंग खात्यात सिक्युरिटीजचे व्यवहार सुलभ होतात.



गुंतवणूकदारांकरिता रनिंग खाते स्वैच्छिक असण्यासह उपयुक्त सुविधा आहे तसेच त्यांच्यासाठी उपयोगी आहे, जे वारंवार सिक्युरिटीजची खरेदी आणि विक्री करतात. रनिंग खात्याची अवधि निश्चित केली जाऊ शकते व त्यास कोणत्याही क्षणी रद्द केली जाऊ शकते. ब्रोकर ग्राहकाद्वारे निवडलेल्या विकल्पाप्रमाणे ३० दिवस/९० दिवसांमध्ये कमीत कमी एक वेळा पैसे व सिक्युरिटीजची सेटलमेंट करतो.

# २०

## ट्रेड पडताळणी

तुमच्या खात्यातील क्रियान्वित ट्रेड्सची सत्यता तपासण्यासाठी एक्सचेंजांच्या संकेतस्थळावर उपलब्ध ट्रेड वेरिफिकेशन मॉड्यूल एक खूपच सरळ उपकरण आहे. ट्रेडिंगचा डेटा टी+१ दिवसांवर पडताळणीसाठी उपलब्ध असतो.



# २१

## मार्जिन मनी काय आहे ?

मार्जिन मनी एक्सचेंज/क्लियरिंग कॉर्पोरेशन द्वारे निश्चित केले जाते आणि त्यांच्या वतीने व्यापार करण्यापूर्वी गुंतवणूकदारांकडून दलालांद्वारे गोळा केले जाते. भरणा न केलेला निधी (नॉन-पेड फंड) किंवा सिक्युरिटीज न मिळाल्याचा धोका कमी करण्यासाठी गुंतवणूकदाराकडून मार्जिन पैसे गोळा केले जातात. मार्जिन मनी रोख रक्म किंवा सिक्युरिटीज किंवा रोखेच्या सक्षम म्हणजेच फिक्स डिपॉझिट, बँक गॅरंटी, म्युच्युअल फंड युनिट्स, गवर्मेंट सिक्युरिटीज आणि डीमॅट रुपातील ट्रेजरी बिल्स, इ. रूपात असू शकते.



१ सप्टेंबर, २०२० पासून गुंतवणूकदार (क्लायंट्स) सिक्युरिटीजला स्टॉक ब्रोकर कडे नियुक्त केलेल्या डीमॅट खात्यात गहाण ठेवून मार्जिन मनी 'सिक्युरिटीज' रूपात पूर्ण करू शकतात.

अर्ली पे-इन: जर एखाद्या गुंतवणूकदाराला मार्जिनचा भरणा करताना सूट हवी असेल तर तो अर्ली पे-इन सुविधेचा लाभ घेऊ शकतो. ही सुविधा घेतल्यानंतर ब्रोकरला पैशाचा भरणा/शेयर डिलिव्हरी पे-इन तारखेच्या आधी किंवा ब्रोकरने दिलेल्या वेळ/तारखेला करावी लागेल.

# २२

## स्टॉक ब्रोकर तसेच डिपॉजिटरी पार्टिसिपंट्स कडून खात्याचा तपशील (स्टेटमेंट)

तुम्हाला तुमच्या द्वारे केल्या गेलेल्या व्यवहाराच्या संबंधी ब्रोकर तसेच डिपॉजिटरीज कडून नियमित आधारावर विनाशुल्क मासिक रिपोर्ट, त्रैमासिक रिपोर्ट, इत्यादि रिपोर्ट प्राप्त करण्याचा हक्क आहे. डिपॉजिटरीज तसेच स्टॉक एक्सचेंज तुमच्या खात्यात झालेल्या व्यवहारांच्या संबंधी तुम्हाला तुमच्या नोंदणीकृत भ्रमणध्वनी क्रमांक वा ई-मेल आयडीवर सूचित करतात.



जर तुम्ही संदेश समजण्यास असमर्थ असाल तर बँक, डिपॉजिटरी पार्टिसिपंट्स, स्टॉक एक्सचेंज, ब्रोकर सह मुद्दा सोडवू शकता किंवा मार्गदर्शनासाठी सेबीच्या टोल फ्री हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधू शकता. वेळोवेळी अलर्ट्स तसेच खात्याचा तपशील प्राप्त करण्यासाठी मध्यस्थांसह आपले कॉंटॅक्ट विवरण नेहमी अद्ययावत (अपडेट) ठेवा. रिपोर्ट न मिळाल्यास तुम्ही संबंधित व्यक्तींसह मुद्दा उपस्थित करु शकता.

तुम्ही ब्रोकर द्वारे विधिवत स्वाक्षरीकृत हार्ड फॉर्म मध्ये प्रत्येक वर्षाच्या ३१ मार्च रोजी पैसे तसेच सिक्युरिटीजच्या बॅलेंसचा तपशील प्राप्त करण्यासाठी हकदार आहात.

## २३

## कंसोलिडेटेड अकाउंट स्टेटमेंट (सीएएस)

कंसोलिडेटेड अकाउंट स्टेटमेंट (सीएएस) एक एकेरी/संयुक्त अकाउंट स्टेटमेंट आहे, जो महिन्याचा गुंतवणूकदाराद्धारे डिमॅट खात्यात धारित सर्व म्युच्युअल फंड्स तसेच इतर सिक्युरिटीज मध्ये केल्या गेलेल्या आर्थिक व्यवहारांचा विस्तृत तपशील दाखवतो. तुमचे सीएएस प्राप्त करण्यासाठी तुम्हाला तुमचा पॅन कार्ड नंबर स्टॉक ब्रोकर/डिपॉजिटरी पार्टिसिपंट्स कडे अपडेट करायला हवा.




## २४

## डेरिव्हेटिव्ज मार्केट

डेरिव्हेटिव्ज असे आर्थिक साधन आहे, जे आपले मूल्य डेरिव्हेटिव्ह मधे समाविष्ट सिक्युरिटीज किंवा आर्थिक संसाधनाद्धारे प्राप्त करते. डेरिव्हेटिव्ह मधे समाविष्ट प्रोडक्ट इक्विटी, करंसी, इत्यादि असू शकतात.

डेरिव्हेटिव्जचा प्राथमिक उपयोग गुंतवणूकदाराच्या पोजिशनचे रक्षण (हेजिंग) करणे तसेच मूल्याच्या जोखमेला कमी करण्यासाठी आहे. मुळात हेजिंग ही एक जोखीम व्यवस्थापनाची रणनीती असते, ज्यामध्ये गुंतवणूकदार किंमतीच्या कोणत्याही प्रतिकूल हालचालींच्या जोखमीपासून बचाव करण्यासाठी धोरणात्मकपणे साधनांमध्ये गुंतवणूक करतात.



डेरिव्हेटिव्ज मध्ये व्यवहार करणारे हेजर, सट्टेबाज तसेच आर्बिट्रेजर्स (भावफरकाचा लाभ घेणारे) असू शकतात आणि विभिन्न परिस्थितीत वेगवेगळ्या भूमिका निभाऊ शकतात.

फ्यूचर्स तसेच ऑप्शन्स, ज्यास विशेषतः एफअँडओ सेगमेंटच्या रुपात ओळखले जाते, जे सिक्युरिटी मार्केटच्या डेरिव्हेटिव्ज सेगमेंटचा एक अनिवार्य भाग आहे. फ्यूचर्स व ऑप्शन्स डेरिव्हेटिव्जचे दोन विभिन्न प्रकार आहेत.

फ्यूचर्स काँट्रॅक्ट भावी तिथि वर पूर्वनिर्धारित दरावर एका समाविष्ट प्रॉडक्टच्या खरेदी वा विक्रीचे मान्यताप्राप्त एक्सचेंज ट्रेडेड काँट्रॅक्ट आहे.

ऑप्शन काँट्रॅक्ट एक आर्थिक साधन आहे, जे ऑप्शनच्या खरेदीकर्त्यास निर्धारित किंमतीवर निर्धारित दिवशी पर्यायाचा उपयोग करण्याचा अधिकार देतो, पण असे करण्यासाठी आपले दायित्व थोपत नाही.
कॉल ऑप्शन्स व्यक्तीला समाविष्ट सिक्युरिटीज खरेदी करण्यासाठी आणि पुट ऑप्शन समाविष्ट सिक्युरिटीजची विक्री करण्याचा अधिकार देतो. गुंतवणूकदार जेव्हा ऑप्शन्स काँट्रॅक्ट खरेदी करतात तेव्हा त्यांच्याकडून प्रीमियम आकारला जातो.

कृपया लक्षात घ्या की डेरिव्हेटिव्ज उच्च-जोखीम असणारी प्रॉडक्ट्स आहेत आणि हेजिंगच्या उद्देशाने वापरली जातात. किरकोळ गुंतवणूकदारांसाठी याची शिफारस केलेली नाही.

## म्युच्युअल फंड आणि ईटीएफ

# २५

### म्युच्युअल फंड

म्युच्युअल फंड बऱ्याच गुंतवणूकदारांकडून निधी गोळा करते आणि हे पैसे स्टॉक, बॉन्ड्स, शॉर्ट टर्म मनी-मार्केट इन्स्टुमेंट्स, इतर सिक्युरिटीज किंवा मालमत्ता किंवा या गुंतवणूकींच्या संयोजनात गुंतवते. म्युच्युअल फंडांना कोणतीही योजना सुरू करण्यापूर्वी सेबीकडे नोंदणीकृत असणे आवश्यक आहे. म्युच्युअल फंडांना म्युच्युअल फंड योजनेच्या उद्दीष्टांच्या आधारे वेगवेगळ्या श्रेणींमध्ये विभागले जाऊ शकते. ही योजना वेगवेगळ्या प्रकारच्या गुंतवणूकदारांची जोखिमग्रस्त गुंतवणूकदारांची (मुळात जास्त धोका नसलेले पुराणमतवादी गुंतवणूकदार), मध्यम गुंतवणूकदार (अल्प जोखिम गुंतवणूकदार) आणि अति-महत्वाकांक्षी गुंतवणूकदार (उच्च परताव्यासाठी जोखिम घेण्यास इच्छुक गुंतवणूकदार) यांच्या गरजा भागविण्यासाठी तयार केली गेली आहे, हे लक्षात ठेवून केले जाते.



स्कीम्सच्या आधारावर म्युच्युअल फंड्सचे वर्गीकरणः म्युच्युअल फंड्स ५ स्कीम्सच्या आधारावर वर्गीकृत केले गेले आहेत, जे पुढीलप्रमाणे आहेतः

| | |
|---|---|
| ए | **इक्विटी स्कीम्सः** हे म्युच्युअल फंड्स प्रामुख्याने स्टॉक्स मध्ये गुंतवणूक करतात. |
| बी | **डेब्ट स्कीम्सः** हे म्युच्युअल फंड्स प्रामुख्याने बाँड्स तसेच ट्रेजरी बिल्स सारख्या निश्चित इन्कम सिक्युरिटीज मध्ये गुंतवणूक करतात. |
| सी | **हायब्रिड स्कीम्सः** हे म्युच्युअल फंड्स दोन किंवा त्याहून अधिक संपत्त्या जसे की इक्विटीज, निश्चित इन्कम, रोखे, इत्यादि मध्ये गुंतवणूक करतात. |
| डी | **सोल्युशन ओरिएंटेड स्कीम्सः** हे म्युच्युअल फंड्स सेवानिवृत्त तसेच लहान मुलांसाठी योजना, इत्यादि व्यक्तींच्या लक्ष्यानुसार गुंतवणूक करतात. |
| इ | **इतर स्कीम्सः** इतर योजना जशा इंडेक्स फंड्स, सेक्टरल फंड्स, इ. |

# २६

## म्युच्युअल फंडामध्ये गुंतवणूक कशी करावी?

म्युच्युअल फंड सहसा वर्तमानपत्रांमध्ये जाहिराती देतात जे नवीन योजना सुरू होण्याची तारीख प्रकाशित करतात. गुंतवणूकदार एजंट आणि म्युच्युअल फंड वितरकांशी संपर्क साधू शकतात, जे आवश्यक माहिती आणि अर्ज फॉर्मसाठी देशभर पसरलेले आहेत. म्युच्युअल फंडामध्ये गुंतवणूक करताना गुंतवणूकदारांना प्रथम त्यांची केव्हायसी प्रक्रिया पूर्ण करावी लागेल. एखादा गुंतवणूकदार फंडाच्या शाखेत किंवा रजिस्ट्रार कार्यालयात जाऊन केव्हायसी करू शकतो. वैकल्पिकरित्या, कोणीही आपले आधार कार्ड आणि पॅन नंबर वापरुन ई-केवायसी करू शकतो.


एकदा केव्हायसी प्रक्रिया पूर्ण झाल्यावर गुंतवणूकदाराला ज्या योजनेत गुंतवणूक करायची आहे त्याचा निर्णय घ्यावा लागेल. हा निर्णय जोखमेची क्षमता आणि आर्थिक लक्ष्यांवर आधारित आहे. जेव्हा गुंतवणूकदाराने म्युच्युअल फंडाची योजना शॉर्टलिस्ट केली असेल तर त्या संबंधित योजनांमध्ये गुंतवणूकीसाठी आवश्यक अर्ज भरावे लागतील. अशी सेवा पुरविणाऱ्या एजंट्स आणि वितरकांद्वारे म्युच्युअल फंडामध्ये फॉर्म जमा केले जाऊ शकतात. अर्ज भरताना, गुंतवणूकदाराने आपले नाव, पत्ता, अर्ज करण्याच्या युनिट्सची संख्या आणि अशा इतर माहिती नमूद केल्या पाहिजेत. लाभांश किंवा पुन्हा खरेदी करण्याच्या उद्देशाने, भविष्यातील तारखेला म्युच्युअल फंडाद्वारे जारी केलेला कोणताही धनादेश/ड्राफ्ट, इतर कोणतीही व्यक्ती वापरू नये म्हणून त्याने त्याचा बँक खाते क्रमांक द्यावा. म्युच्युअल फंडांना पत्ता, बँक खाते क्रमांक, इत्यादी बदलांची त्वरित माहिती नंतरच्या तारखेला द्यावी. गुंतवणूकदारांकरिता प्रक्रिया अधिक सुलभ बनवण्यासाठी म्युच्युअल फंड्स पुढीलप्रमाणे पर्याय सादर करतात:

- **सिस्टेमेटिक इन्व्हेस्टमेंट प्लान:** नियमित वेळेच्या अंतराने विशेष योजनेत निश्चित रक्कमेची गुंतवणूक करण्याची सुविधा.
- **सिस्टेमेटिक विथड्रॉवल प्लान:** नियमित वेळेच्या अंतराने विशेष योजनेतून निश्चित रक्कम काढण्याची सुविधा.
- **सिस्टेमेटिक ट्रांसफर प्लान:** नियमित वेळेच्या अंतराने एका योजनेतून दुसऱ्या योजनेत रक्कमेचे हस्तांतरण करण्याची सुविधा.

# २७

## म्युच्युअल फंड्सच्या प्रॉडक्ट्सचे लेबलिंग:

सेबी दिशानिर्देशानुसार, म्युच्युअल फंड्स स्कीम्सची लेबलिंग धोक्याच्या स्तरानुसार केली जाते तसेच त्यास रिस्क-ओ-मीटर वर दर्शवायला हवे, रिस्क-ओ-मीटरचे विभिन्न लेबल्स पुढीलप्रमाणे आहेत.



- लो (कमी): गुंतवणूकीच्या मूळ रक्कमेवर कमी धोका
- लो टू मॉडरेट (मध्यम कमी): मूळ रक्कमेवर मध्यम धोका
- मॉडरेट (मध्यम): मूळ रक्कमेवर वर मध्यम धोका
- मॉडरेटली हाय (मध्यम उच्च): रक्कमेवर मध्यम उच्च धोका
- हाय (उच्च): सरासरी दर्ज्याहून उच्च धोका
- वेरी हाय (अत्युच्च): रक्कमेवर अत्युच्च धोका

\- रिस्क-ओ-मीटरचे आकलन मासिक आधारावर केले जाते.

\- म्युच्युअल फंड्स/एएमसी'ज यांनी त्यांच्या सर्व स्कीम्सच्या खुलासा पोर्टफोलियो आणि रिस्क-ओ-मीटर सह प्रत्येक महिना पूर्ण झाल्यानंतरच्या १० दिवसांच्या आंत त्यांच्या संकेतस्थळावर व एएमएफआय संकेत स्थळावर हवा.

कोणत्याही विशिष्ट योजनेत गुंतवणूकीसाठी एजंट्स/वितरकांद्वारे दिल्या गेलेल्या कमिशन/भेटवस्तूंमुळे गुंतवणूकदारांनी लालच करू नये. खरंतर त्यांनी म्युच्युअल फंडाच्या ट्रॅक रेकॉर्डचा विचार केला पाहिजे आणि तटस्थपणे तसेच माहिती घेऊन निर्णय घ्यावेत.

# २८

## एक्सचेंज ट्रेडेड फंड (ईटीएफ)




एक्सचेंज ट्रेडेड फंड (ईटीएफ) ही अशी सिक्युरिटी आहे, जी इंडेक्स, कमोडिटी, बॉन्ड किंवा इंडेक्स फंड सारख्या सिक्युरिटीजच्या बास्केटचे अनुसरण करतात आणि त्यांची सिक्युरिटीज मार्केटमध्ये ट्रेडिंग होते. सोप्या शब्दांत म्हटले तर ईटीएफ हे सेन्सेक्स, निफ्टी यांसारख्या निर्देशांकांचे अनुसरण करतात. जेव्हा तुम्ही ईटीएफचे युनिट खरेदी करता, तेव्हा प्रत्यक्षात अशा पोर्टफोलिओचे युनिट खरेदी करता, जे निर्देशांकाच्या कामगिरीचे अनुसरण करतात. ईटीएफ ज्या निर्देशांकाचे अनुसरण करते, त्याचे प्रतिबिंब मात्र आहे.

म्युच्युअल फंडाच्या विपरीत, ईटीएफ स्टॉक एक्सचेंजवर एक सामान्य स्टॉक म्हणून ट्रेडिंग करते आणि ट्रेडिंगनुसार ईटीएफच्या मूल्यात बदल होतो. ईटीएफच्या ट्रेडिंग किंमतीचा आधार त्यात समाविष्ट (अंडरलाइंग) ॲसेटची नेट ॲसेट व्हॅल्यू आहे. ईटीएफमध्ये सामान्यत: म्युच्युअल फंड योजनांच्या तुलनेत उच्च दैनंदिन तरलता आणि कमी फी असते.

# सिक्युरिटीज बाजारात तक्रारींचे निवारण

## २९

## सेबी कंप्लेट्स रिड्रेस सिस्टम (स्कोर्स)

सिक्युरिटीज बाजारा संबंधी तक्रारींच्या संदर्भात तुम्ही प्रथम संबंधित मध्यस्थांशी किंवा कंपनीशी संपर्क करु शकता. संबंधित मध्यस्थ वा कंपनी तुमच्या तक्रारींचे निवारण करण्याची सुविधा देतात. तक्रारीचे निवारण झाले नाही, तर तुम्ही संबंधित स्टॉक एक्सचेंज वा डिपॉजिटरीकडे संपर्क करु शकता.


जर तुम्ही वर नमूद केलेल्या स्तरावर निवारणाशी संतुष्ट नसाल, तर तुम्ही वेब आधारित केंद्रीय तक्रार निवारणाद्वारे सेबी मध्ये तक्रार नोंदवू शकता, जिला 'स्कोर्स' म्हटले जाते (सेबी तक्रार निवारण प्रणाली). स्कोर्स पोर्टलचा पत्ता http://scores.gov.in. आहे. स्कोर्स विषयी अधिक माहितीकरिता तुम्ही सेबीचे टोल फ्री क्रमांक- १८०० २२ ७५७५ , १८०० २६६ ७५७५ वर संपर्क करु शकता. जर तुम्ही स्कोर्स वर तक्रार केली असेल, तर तुम्ही कधीही कुठूनही तक्रार कोणत्या टप्प्यात आहे, याची ऑनलाइन माहिती करु शकता.




## ३०

## स्टॉक एक्सचेंजचा इन्व्हेस्टर सर्विसेस सेल

इन्व्हेस्टर सर्विसेस सेल गुंतवणूकदारांच्या प्रश्नांचे, तक्रारींचे निवारण करतो आणि वादांना अर्ध-न्यायिक समाधाना करिता आर्बिट्रेशन मॅकेनिज्म प्रदान करतो.



स्टॉक एक्सचेंज एनएसई स्थित इन्व्हेस्टर ग्रीवंसेस रिजॉल्युशन पॅनल (आयजीआरपी) तसेच बीएसई लि. स्थित इन्व्हेस्टर ग्रीवंस रिड्रेसल कमिटी (आयजीआरसी) द्वारे गुंतवणूकदारांच्या तक्रारींचे निवारण करण्याची सुविधा देतो.

गुंतवणूकदारांच्या तक्रारीचे निवारण करण्यासाठी हे एक्सचेंज देशभरातील विविध प्रदेशांमधे इन्वेस्टर्स सर्विसेस केंद्र चालवत आहेत. या केंद्राची संपूर्ण यादी एक्सचेंजच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

# ३१

## आर्बिट्रेशन मॅकेनिज्म

गुंतवणूकदार तसेच स्टॉक ब्रोकर यांच्या मध्ये वादाच्या समाधानाची अर्ध-न्यायिक प्रक्रिया आर्बिट्रेशनच्या स्वरुपात मानली जाते. जेव्हा दोन्हीं पक्षांपैकी एक पक्षाला असे वाटते की दुसऱ्या पक्षाद्वारे स्टॉक एक्सचेंजची तक्रार निवारण प्रक्रियेद्वारे तक्रारीचे संतोषपूर्ण समाधान झाले नाही, तर पक्ष स्टॉक एक्सचेंज मध्ये उपलब्ध आर्बिट्रेशन प्रक्रियेचा मार्ग निवडू शकतो.

आर्बिट्रेशन प्रक्रिया तसेच शुल्क व समाविष्ट लेवीच्या संबंधित अधिक माहितीकरिता तुम्ही संबंधित स्टॉक एक्सचेंजच्या संकेतस्थळी भेट देऊ शकता.



## दावा किंवा पेमेंट न केल्या गेलेल्या रक्कमेसंबंधित माहिती - आयईपीएफ

गुंतवणूकदारांची जागरुकता व त्यांच्या हितांच्या रक्षेला बढत देण्यासाठी कंपनीज ॲक्ट, २०१३ सेक्शन १२५सीच्या अन्वये इन्व्हेस्टर एज्युकेशन ॲंड प्रोटेक्शन फंड (आयईपीएफ)ची स्थापना केली गेली आहे. आयईपीएफ अथॉरिटी ही एक वैधानिक संस्था असून ती कंपनी अधिनियम, २०१३ च्या तरतुदींनुसार स्थापन केली गेली आहे.
जो लाभांश किंवा शेयर्स ज्याचा सलग सात वर्षे भरणा केला नसेल किंवा ज्यासाठी गूंतवणूकदारांनी दावा केलेला नसेल, तर संबंधित कंपन्यांमार्फत गुंतवणूकदार शिक्षण व संरक्षण निधी प्राधिकरणाकडे (आयईपीएफ) हस्तांतरित केले जातात. गुंतवणूकदार किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी या भरणा न केलेल्या लाभांश आणि/किंवा दावा न केलेल्या शेयर्सचा रिफंड मिळविण्यासाठी आयईपीएफ प्राधिकरणाकडे आपले दावे सादर करणे आवश्यक आहे.

अधिक माहितीकरिता
http://www.iepf.gov.in/IEPF/refund.html
संकेतस्थळाला भेट द्या.



# ३२

## परिशिष्ट - १

(सिक्युरिटीज मार्केट मध्ये गुंतवणूक/ट्रेडिंग साठी काय करावे व काय करु नये)

## काय करावे

- सिक्युरिटीज मार्केट मध्ये भांडवल गुंतवणूकीच्या आवश्यकतेसाठी सेबी नोंदणीकृत गुंतवणूक सल्लागाराकडूनच सल्ला घ्या.
- तुमच्या गुंतवणूकीचे उद्देश्य तसेच धोका पत्करण्याच्या क्षमतेला ध्यानात ठेवूनच गुंतवणूक करा.
- केल्या गेलेल्या ट्रांजॅक्शनच्या २४ तासांच्या आत वैध काँट्रॅक्ट नोट/पुष्टि पत्र प्राप्त करण्यावर जोर द्या. नियमित रुपात तुमच्या डिमॅट खात्यातील तुमच्या पोर्टफोलियोची पडताळणी करत रहा.
- स्वाक्षरी करण्यापूर्वी सर्व कागदपत्रे काळजीपूर्वक वाचा.
- तुमच्या खात्यात लागू सर्व शुल्क/फी/ब्रोकरेज यांची नोंद ठेवा.
- स्वाक्षरीकृत केलेली कागदपत्रे, खात्याचा तपशील (अकाउंट स्टेटमेंट), प्राप्त केलेल्या काँट्रॅक्ट नोट्स तसेच केल्या गेलेल्या पेमेंटची नोंद ठेवा.
- वेळोवेळी तुमच्या आर्थिक गरजा/ध्येयांची पुनर्समीक्षा करा आणि त्यास प्राप्त करण्याच्या संभाव्यतेला सुनिश्चित करण्यासाठी पोर्टफोलियोची पुनर्समीक्षा करा.
- नेहमी बँकिंग चॅनल्सच्या माध्यमातूनच तुमचे ट्रांजॅक्शनचा भरणा (पेमेंट) करा म्हणजेच रोख्यात व्यवहार करु नका.
- तुमची माहिती नेहमी अपडेट ठेवा. तुमचा पत्ता, बँक स्टेटमेंट, ई-मेल आयडी किंवा भ्रमणध्वनी क्रमांकात बदल झाला असेल, तर तुमच्या स्टॉक ब्रोकर/डिपॉजिटरी पार्टिसिपंटला कळवा. सिम कार्ड मध्ये आता पोर्ट करण्याची सुविधा मिळाल्याने गुंतवणूकदार आपल्या संबंधित खात्यासह एकच क्रमांक जोडू शकतात (सर्व महत्वपूर्ण ट्रांजॅक्शनसाठी भ्रमणध्वनी क्रमांक महत्वपूर्ण आहे).
- तुमच्या सर्व गुंतवणूकीकरिता नॉमिनेशन सुविधेचा लाभ घ्या. डिमॅट खात्यामध्ये एकाहून अधिक नॉमिनेशनची सूट आहे.
- तुमच्या रनिंग खात्याची (निर्धारित केल्या गेलेल्या ३०/९० दिवस) नियमित पडताळणी करत रहा.
- तुमच्या रनिंग खात्याची नियमित पडताळणी करत रहा.
- नियमित रुपाने तुमच्या ट्रेडिंग खात्याची समीक्षा करत रहा.

- केल्या गेलेल्या ट्रेड संबंधित दैनिक संदेश तसेच एक्सचेंज द्वारे मिळणाऱ्या ई-मेल्सची नियमित पडताळणी करा.

- ट्रेडिंग सदस्याकडे ठेवलेल्या ट्रेडिंग खात्यात फंड्स तसेच सिक्युरिटीजच्या बॅलेंस संबंधी एक्सचेंज कडून मिळणाऱ्या मासिक संदेश तसेच ई-मेल्सची नियमित पडताळणी करा.

# काय करु नये

- कर्ज घेऊन गुंतवणूक करु नका.

- अनोंदणीकृत ब्रोकर्स/सब-ब्रोकर किंवा अनोंदणीकृत मध्यस्थांसह व्यवहार करु नका.

- मध्यस्थांना ठरवलेल्या दलाली/शुल्काहून अधिक भरणा करु नका.

- कोणत्याही मध्यस्थासह कोणतेही कागदपत्र क्रियान्वित करण्यापूर्वी त्यांच्या अटी व नियमांना पूर्णपणे समजून घ्या.

- कोणत्याही रिक्त अर्जावर किंवा डिलीवरी इंस्ट्रक्शन स्लिप्स वर स्वाक्षरी करु नका.

- स्टॉक ब्रोकर/डिपॉजिटरी पार्टिसिपंट्सच्या नावे जनरल पॉवर ऑफ एटर्नी जारी करु नका. जर तुम्ही पॉवर ऑफ एटर्नी जारी करु इच्छिता, तर सावधानी बाळगून स्पेसिफिक पॉवर ऑफ एटर्नी जारी करा.

- वादांच्या संबंधी, पर्याप्त वेळेत मध्यस्थ/स्टॉक एक्सचेंज/सेबीला लेखी तक्रार करा.

- डब्बा ट्रेडिंग बेकायदेशीर आहे. जर तुम्हाला वाटत असेल की किंमतीच्या दृष्टिकोनातून हे स्वस्त आहे, तरी सुद्धा डब्बा ट्रेडिंग पासून दूर रहा, कारण यात सुरक्षा तसेच स्टॉक एक्सचेंज कडून मिळणाऱ्या खात्रीचा कोणताही लाभ मिळत नाही.

- हॉट टिप्स वर विश्वास करुन गुंतवणूक करु नका, कारण अशा टिप्स त्याच लोकांच्या माध्यमातून पसरवली जाते, जे विक्री न होणाऱ्या सिक्युरिटीजना विकू इच्छितात. हॉट टिप्सचा प्रसार बेकायदेशीर आहे, ज्याविषयी सेबीला सूचित केले पाहिजे.

- कोणासोबतही तुमच्या ऑनलाइन खात्याच्या पासवर्डचे आदान-प्रदान करु नका. वारंवार पासवर्ड बदलत रहा.

- भ्रामक (पाँजी) स्कीम्स, अनोंदणीकृत चीट फंड्स, कलेक्टिव इन्व्हेस्टमेंट वा डिपॉजिट स्कीम्स मध्ये गुंतवणूक करु नका.

- तुमच्या केव्हायसी कागदपत्रांमध्ये रिक्त जागा अंकित (स्ट्राइक ऑफ) करायला विसरु नका.

- जर तुम्ही संगणकाशी परिचित नसाल, तर डिजिटल कॉंट्रॅक्टसचा पर्याय निवडू नका.

# ३३

## परिशिष्ट-२

(गुंतवणूकदारांचे अधिकार तसेच जबाबदाऱ्या)




गुंतवणूकदारांचे पुढीलप्रमाणे अधिकार आहेत:

- एक्सचेंज कडून यूनिक क्लायंट कोड (यूसीसी) प्राप्त करणे.
- मध्यस्था द्वारे तयार केल्या गेलेल्या केव्हायसी तसेच इतर कागदपत्रांची प्रतिलिपी प्राप्त करणे.
- केवळ स्वतःच्या यूसीसी मध्येच ट्रेड करणे.
- सदस्यासह अटी पूर्ण झाल्यावरच ऑर्डर ठेवणे.
- सर्वोत्तम मूल्य प्राप्त करणे.
- केल्या गेलेल्या ट्रांजॅक्शनची कॉंट्रॅक्ट नोट प्राप्त करणे.
- लावल्या गेलेल्या शुल्कांचा तपशील विचारणे.
- वेळोवेळी पैसे तसेच सिक्युरिटीज प्राप्त करणे.
- ट्रेडिंग सदस्याकडून खात्याचा तपशील (स्टेटमेंट) प्राप्त करणे.
- खाते सेटल करण्यासाठी सांगणे.
- सहमत वेळपत्रकानुसार स्टेटमेंट प्राप्त करणे.

गुंतवणूकदारांच्या जबाबदाऱ्या

- नो युअर क्लायंट (केव्हायसी) तसेच संबंधित कागदपत्रे तयार करणे.
- ट्रेडिंग मेंबर सह ठरवलेल्या स्वैच्छिक अटींना समजणे.

- ट्रेडिंग मेंबरला दिल्या गेलेल्या अधिकारांना समजणे.
- जोखिम खुलासा कागदपत्र वाचणे.
- प्रॉडक्ट, कार्यान्वयन रुपरेखा आणि वेळमर्यादेला समजणे.
- मार्जिन्सचा भरणा करणे.
- सेटलमेंट करिता वेळोवेळी सिक्युरिटीज सुपुर्द करणे आणि रक्कमेचा भरणा करणे.
- ट्रेड्सच्या तपशीलाची पडताळणी करणे.
- रक्कम तसेच सिक्युरिटीजची उलाढाल माहिती करुन घेण्यासाठी बँक खाते तसेच डीपी खात्याची पडताळणी करणे.
- कॉंट्रॅक्ट नोट्स तसेच खात्याच्या तपशीलाची (स्टेटमेंट) समीक्षा करणे.

# ३४

## परिशिष्ट – ३

### अनोंदणीकृत गुंतवणूक सल्लागारांपासून सावधान रहा

सेबी (गुंतवणूक सल्लागार) विनियम, २०१३ (३ जुलै, २०२० रोजी संशोधित) अंतर्गत गुंतवणूक सल्लागारांची नोंदणी करते. 'गुंतवणूक सल्लागार' म्हणजे अशी कोणतीही व्यक्ती जी ग्राहक किंवा इतर व्यक्ती किंवा एखाद्या व्यक्तीच्या गटाला गुंतवणूक करण्यास सल्ला देण्याच्या व्यवसायात गुंतलेली आहे आणि स्वत: ला कोणत्याही नावाने गुंतवणूक सल्लागार म्हणून वर्णन करते.



गुंतवणूकीचा सल्ला म्हणजे सिक्युरिटीज किंवा गुंतवणूक प्रॉडक्ट्समध्ये गुंतवणूक करणे, खरेदी करणे, विक्री करणे किंवा अन्यथा गुंतवणूक करणे आणि सिक्युरिटीज किंवा गुंतवणूक प्रॉडक्ट्सचा समावेश असलेल्या गुंतवणूकीच्या पोर्टफोलिओच्या लेखी, तोंडी किंवा नफ्यात, क्लायंटच्या फायद्याविषयी सल्ला किंवा संचाराच्या इतर कोणत्याही पद्धतीशी संबंधित आहे, ज्यात क्लायंटची आर्थिक योजना देखील समाविष्ट आहे. वृत्तपत्रे, मासिके, कोणतेही इलेक्ट्रॉनिक किंवा प्रसारण किंवा दूरसंचार माध्यमांद्वारे दिलेला कोणताही गुंतवणूकीचा सल्ला, जे जनतेसाठी व्यापक स्वरूपात उपलब्ध आहे, या नियमांच्या उद्देशाने गुंतवणूकीचा सल्ला मानला जाणार नाही. गुंतवणूक सल्लागार सेबी कडून नोंदणी करून घेतात व त्यासंदर्भात आचारसंहितेचे पालन करतात.

सेबी नोंदणीशिवाय गुंतवणूक सल्लागार म्हणून काम करणे बेकायदेशीर आहे. अशा बेकायदा प्रवृत्तींना आळा घालण्यासाठी सेबी ठोस प्रयत्न करीत आहे. काही बेईमान आणि अज्ञानी संस्था स्वत:ची नोंदणी करून घेत नाहीत आणि आचारसंहितेचे पालन देखील करत नाहीत. गुंतवणूक सल्लागार केवळ गुंतवणूकीशी संबंधित सल्लापुरता मर्यादित आहे. ते रोख रक्कम किंवा सिक्युरिटीज हाताळत नाहीत.

गुंतवणूक सल्लागार म्हणून काम करणाऱ्या नोंदणीकृत किंवा नोंदणीकृत नसलेल्या व्यक्तींकडून केल्या गेलेल्या गैर प्रवृत्तींबद्दल सेबीला माहिती देण्यात आली आहे, त्यातील काही खालीलप्रमाणे आहेतः

- गुंतवणूक सल्लागारा द्वारे ग्राहकांना निश्चित उत्पन्न देण्याची तयारी दर्शवली जात आहे.
- अवाजवी रिटर्न्सचे खोटे वचन देण्यासह ग्राहकांकडून अत्याधिक शुल्काची वसूली केली जात आहे.
- ग्राहकांकडून अत्याधिक शुल्क मिळवण्यासाठी ग्राहकांची धोका पत्करण्याची क्षमता ध्यानात घेतल्याशिवाय मिस-सेलिंग (उत्पादाच्या लाभास बढत देणे) केली जात आहे. नुकसानाच्या भरपाईसाठी ग्राहकांकडून तक्रार प्राप्त झाल्यावर गुंतवणूक सल्लागार ग्राहकास उच्च जोखिम वाले प्रॉडक्ट देऊ करतात आणि वचन देतात की यातून तुमच्या नुकसानाची वसूली होईल.
- ग्राहकांच्या वतीने ट्रेडिंग करतात.
- ग्राहकांच्या संमतीशिवाय उच्च जोखिम असणाऱ्या प्रॉडक्ट्समधे स्वयंचलित रुपात सेवेला अपग्रेड करणे किंवा परिवर्तित करणे, जी ग्राहकाच्या धोका पत्करण्याच्या क्षमतेशी मेळ खात नाही.
- गुंतवणूक सल्लागाराद्वारे वाईट सेवा दिली जात आहे, ज्यामुळे ग्राहकास नुकसान होत आहे. - रिफंड संबंधित मुद्दे.

बाजारात चालत असलेल्या वरील गतिविधींपासून गुंतवणूकदारांना जागरुक तसेच स्वतःस सुरक्षित ठेवले पाहिजे तसेच भांडवली बाजारात तज्ञ असण्याचा दावा करणाऱ्या अशा इसमांपासून सावधानता बाळगणे आवश्यक आहे. गुंतवणूकदारांना सल्ला दिला जातो की त्यांनी सेबी (गुंतवणूक सल्लगार) रेग्युलेशन, २०१३ च्या अन्वये नोंदणीकृत गुंतवणूक सल्लागारांकडूनच सल्ला प्राप्त करावा.

अशा व्यक्तींची ३ जुलै, २०२० रोजी संशोधित सूची https://www.sebi.gov.in. वर उपलब्ध आहे.

## गुंतवणूक सल्लागारासह व्यवहार करतेवेळी काय करावे व काय करु नये

| काय करावे | काय करु नये |
|---|---|
| नोंदणीकृत सल्लागारासह व्यवहार करावा. | अनोंदणीकृत सल्लागारासह व्यवहार करु नका. |
| सेबी नोंदणीकृत क्रमांकासाठी पडताळणी करा. सेबीमध्ये नोंदणीकृत सर्व गुंतवणूक सल्लागारांची सूची सेबीचे संकेतस्थळ (https://www.sebi.gov.in) वर उपलब्ध आहे. | गुंतवणूक सल्लाच्या गडबडीत प्रस्तुत केलेल्या स्टॉक टिप्सकडे आकर्षित होऊ नका. |

| | |
|---|---|
| हे सुनिश्चित करा की गुंतवणूक सल्लागाराकडे वैध नोंदणीकरण प्रमाणपत्र आहे. | गुंतवणूक सल्लागारा भांडवल गुंतवणूकीसाठी कधीच स्वतःकडील रक्कम देऊ नका. |
| तुमच्या गुंतवणूक सल्लागारास फक्त सल्ला शुल्काचाच भरणा करा. | निश्चित रिटर्नच्या भानगडीत पडू नका. |
| फक्त बँकिंग चॅनल्सद्वारे सल्लागाराच्या शुल्काचा भरणा करा आणि तुमच्या भरणाची तपशील पावती सांभाळून ठेवा. | जाहिराती किंवा बाजार अफवांकडे आकर्षित होऊ नका. |
| गुंतवणूकीचा सल्ला घेण्याआधी तुमच्या जोखमेच्या रुपरेखेविषयी विचारा. | गुंतवणूक सल्लागार किंवा त्याच्या प्रतिनिधींकडून आलेला फोन कॉल वा संदेश यांच्या आधारावर ट्रांजॅक्शन करू नका. |
| या गोष्टीवर जोर द्या की गुंतवणूक सल्लागार तुमच्या जोखमेच्या रुपरेखेच्या आधारावरच तुम्हांला सल्ला देईल आणि उपलब्ध गुंतवणूक पर्यायांना ध्यानात ठेवील. | गुंतवणूक सल्लागाराद्वारे वारंवार पाठवलेल्या किंवा फोन संभाषणावर गुंतवणूक करण्याचा निर्णय घेऊ नका. |
| सल्ल्यावर कार्य करण्यापूर्वी तुमच्या गुंतवणूक सल्लागारास यासंबंधी सर्व प्रश्न विचार आणि तुमच्या शंकांना दूर करा. | गुंतवणूक सल्लागाराद्वारे प्रस्तुत केल्या गेलेल्या मर्यादित अवधिच्या डिस्काउंट वा अन्य प्रोत्साहन, गिफ्ट इ. मध्ये फसू नका. |
| गुंतवणूक करण्यापूर्वी गुंतवणूक करण्याचा धोका तसेच सुरक्षेचे आकलन करा. | तुमची धोका पत्करण्याची क्षमता किंवा गुंतवणूकीच्या ध्येयांच्या विरुद्ध जाऊन घाईगडबडीत गुंतवणूक करण्याची चूक करु नका. |
| स्वाक्षरीकृत तसेच लिखित मधील नियम आणि अटी प्राप्त करण्यावर जोर द्या. कोणत्याही गुंतवणूक सल्लागारासह व्यवहार करण्यापूर्वी आधी विशेषतः सल्लागाराचे शुल्क, योजना तसेच शिफारसींची श्रेणी इ. अटी व नियमांचे लक्षपूर्वक वाचन करा. | |
| तुमच्या ट्रांजॅक्शन मध्ये सावधानी बाळगा. | |
| तुमच्या शंका/तक्रारींच्या निवारणासाठी वरील अधिकाऱ्यांना संपर्क करा. | |
| गुंतवणूक सल्लागार सुनिश्चित तसेच खात्रीशीर रिटर्न देण्याची तयारी दर्शवत असेल, तर त्याविषयी सेबीला सूचित करा. | |

# ३५

## परिशिष्ट - ४
## आस्बा मध्ये युनिफाइड पेमेंट इंटरफेस (यूपीआय)

गुंतवणूकदार आता पेमेंट सिस्टम म्हणून युनिफाइड पेमेंट इंटरफेस (यूपीआय) वापरून आयपीओमध्ये गुंतवणूक करु शकतात. यूपीआय ही एक अशी प्रणाली आहे, ज्यात (कोणत्याही सहभागी बँकेसह) बहुविध बँक खात्यांना एकाच मोबाइल ॲप्लिकेशनमधे आणि काही बँकिंग फीचर्स, अवरोधरहित फंड ट्रांसफर आणि व्यापाराच्या पेमेंटला एकाच मॅकेनिज्ममधे विलीन करते.

UNIFIED PAYMENTS INTERFACE

### यूपीआय वापरुन गुंतवणूक कशी करावी:

यूपीआयमार्फत आयपीओमध्ये गुंतवणूक करण्याच्या प्रक्रियेमध्ये पुढील तीन प्रमुख चरण असतात:

**यूपीआय मार्फत निविदा:** गुंतवणूकदारांनी त्यांच्या यूपीआय आयडीद्वारे अर्जामध्ये बोलीचा (बिड) तपशील भरावा. स्टॉक एक्सचेंज बिडिंग प्लॅटफॉर्मवर यूपीआय आयडीसह बोली तपशील अपलोड करणाऱ्या मध्यस्थांना अर्ज सादर केला जाऊ शकतो. स्टॉक एक्सचेंज इश्यूअर कंपनी द्वारे नियुक्त केलेल्या स्पाँसर बँक/एस्क्रोसह गुंतवणूकदारांच्या यूपीआय आयडीसह बोलीचा तपशील इलेक्ट्रॉनिक रूपात वितरीत करेल.

**निधी अवरोधित (ब्लॉक) करणे:** एस्क्रो/प्रायोजक बँक गुंतवणूकदारास चलन रक्कम समान रक्कम ब्लॉक करण्यास आणि नंतर वाटप झाल्यास रक्कम डेबिट करण्याची विनंती करेल. गुंतवणूकदाराने रक्कम रोखण्यासाठी केलेली विनंती मान्य केल्यानंतर ही रक्कम गुंतवणूकदारांच्या खात्यात रोखली जाईल आणि गुंतवणूकदारांना त्याबद्दल कळविले जाईल.

**वाटपाच्या प्रक्रियेनंतर समभागांना देय रक्कम:** समभागांचे वाटप झाल्यानंतर गुंतवणूकदारांच्या खात्यातून निधी डेबिट करण्याची प्रक्रिया सुरु होईल आणि अतिरिक्त निधीचे ब्लॉक काढून टाकले जाईल (अनलॉक केले जाईल). ही प्रक्रिया फंड रोखण्याच्या वेळी यूपीआय पिन वापरणाऱ्या गुंतवणूकदारांनी दिलेल्या अधिकृततेवर आधारित असेल.

**आयपीओमध्ये गुंतवणूकीसाठी यूपीआय वापरत असताना लक्षात ठेवण्याजोगे मुद्दे:**

- अशा बँकेकडून आपला यूपीआय आयडी तयार करा, जिचे नाव सेबीच्या वेबसाइटवर उपलब्ध असलेल्या सेल्फ-सर्टिफाइड सिंडिकेट बँक (एससीबीए) च्या यादीमध्ये नमूद केला असेल, जी इश्यूअर बँक म्हणून काम करते.
- सेबी वेबसाइटवर उपलब्ध असलेले फक्त मोबाईल एप्लिकेशन्स आणि यूपीआय हँडल्स वापरा ज्यांचा वेबसाइट सार्वजनिक समस्यांमध्ये यूपीआय वापरण्यासाठी मोबाइल एप्लिकेशन्सच्या यादीमध्ये उल्लेख आहे.
- केवळ सिंडिकेट सदस्य, किंवा नोंदणीकृत स्टॉक ब्रोकर, किंवा एक रजिस्ट्रार आणि हस्तांतरण एजंट किंवा डिपॉझिटरी सहभागीसाठी एक देयक यंत्रणा म्हणून आपला अर्ज फॉर्म यूपीआयकडे जमा करा.
- यूपीआयवर प्रति व्यवहार आयपीओ अर्जाची मर्यादा २ लाख रुपये आहे आणि ती केवळ किरकोळ वैयक्तिक गुंतवणूकदारांना उपलब्ध आहे.
- थर्ड पार्टी यूपीआय आयडी किंवा थर्ड पार्टी बँक खाते वापरणाऱ्या गुंतवणूकदारांच्या वाटपासाठी विचार केला जाणार नाही.

# ३६

## परिशिष्ट - ५
### शब्दकोष

| क्रमांक | संक्षिप्त | पूर्ण रूप |
|---|---|---|
| १. | एएमसी | एन्युअल मेंटेनन्स चार्जेस |
| २. | एएसबीए (आस्बा) | ॲप्लिकेशन सपोर्टेड बाय ब्लॉक्ड अमाउंट |
| ३. | बीएसडीए | बेसिक सर्व्हिसेस डिमॅट अकाउंट |
| ४. | सीएएस | कंसोलिडेटेड अकाउंट स्टेटमेंट |
| ५. | सीडीएसएल | सेंट्रल डिपॉजिटरी सर्विसेस (इंडिया) लि. |
| ६. | डिमॅट | डिमटेरियलाइज्ड |
| ७. | डीपी | डिपॉजिटरी पार्टिसिपंट्स |
| ८. | आयए | इन्व्हेस्टमेंट ॲडवायजर्स |
| ९. | आयजीआरसी | इन्व्हेस्टर ग्रीवंस रिड्रेसल कमिटी |
| १०. | आयजीआरपी | इन्व्हेस्टर ग्रीवंस रिजॉल्युशन पॅनल |
| ११. | आयपीओ | इनीशियल पब्लिक ऑफरिंग |
| १२. | केआयएन | केव्हायसी आयडेंटिफिकेशन नंबर |
| १३. | केव्हायसी | नो यूअर क्लायंट |
| १४. | एमआयआय | मार्केट इन्फ्रास्ट्रक्चर इंटरमीडियरीज |
| १५. | एमएसई | मेट्रोपॉलिटन स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लि. |
| १६. | एनएसडीएल | नॅशनल सिक्युरिटीज डिपॉजिटरी लि. |
| १७. | एनएसई लि. | नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लि. |
| १८. | पीएएन | पर्मानंट अकाउंट नंबर |
| १९. | पीओए | पॉवर ऑफ ॲटर्नी |
| २०. | स्कोर्स | सेबी कंप्लेंट रिड्रेस सिस्टम |
| २१. | सेबी | सिक्युरिटीज ॲंड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया |
| २२. | एसएमएस | शॉर्ट मेसेज सर्विस |
| २३. | यूसीसी | यूनिक क्लायंट कोड |
| २४. | युआयडी | यूनिक आयडेंटिफिकेशन |

## सेबीचा गुंतवणूक जागृतीसाठीचा पुढाकार

- **रिसोर्स पर्सन्स कार्यक्रमः**

  सेबी रिसोर्स पर्सन्स पॅनल असे आहे की जे टायर-२/टायर-३ शहरांमधे/नगरांमधे आणि त्यांच्या स्थानिक भाषांमधे विवध लक्षित समूह जसे निवृत्त व्यक्ती, बचत गट (सेल्फ-हेल्प ग्रुप) कार्यरत अधिकारी इ. साठी आर्थिक शिक्षण कार्यक्रम आयोजित करतात.

- **सेबी कार्यक्रमांना भेटः**

  जे सेबीच्या कार्यालयात भेट देतात, अशा महाविद्यालय, शाळा आणि प्रोफेशनल इंस्टिट्यूटच्या विद्यार्थ्यांसाठी सेबी गुंतवणूकदार जागृती कार्यक्रम आयोजित करू शकते.

- **प्रादेशिक परिसंवादः**

  सेबी द्वारे स्टॉक एक्सचेंज डिपॉजिटरीज, एएमएफआय कमॉडिटी डेरिव्हेटिव्ह एक्सचेंजेस, वगैरेंच्या सहयोगाने शिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात येतात.

- **इन्व्हेस्टर्स असोसिएशन द्वारे गुंतवणूकदार जागृती कार्यक्रमः**

  इन्व्हेस्टर्स असोसिएशन (आयए'ज) द्वारे गुंतवणूकदार जागृती कार्यक्रम टायर-२/टायर-३ शहरांमधे/नगरांमधे आयोजित करण्यात येतात.

- **कमॉडिटी डेरिव्हेटिव्हज ट्रेनर्स (सीओटी'ज) द्वारे गुंतवणूकदार जागृती कार्यक्रमः**

  कमॉडिटी डेरिव्हेटिव्हज ट्रेनर्स (सीओटी'ज) द्वारे गुंतवणूकदार जागृती कार्यक्रम टायर-२/टायर-३ शहरांमधे/नगरांमधे आयोजित करण्यात येतात.

- सिक्युरिटीज मार्केट ट्रेनर्स (स्मार्ट्स) द्वारे गुंतवणूकदार शिक्षण कार्यक्रम:

  सिक्युरिटीज मार्केट मधे सेबी द्वारे मान्यता प्राप्त सिक्युरिटीज मार्केट ट्रेनर्स (स्मार्ट्स) द्वारे गुंतवणूक शिक्षण कार्यक्रम टायर-२/टायर-३ शहरांमधे/नगरांमधे आयोजित करण्यात येतात.

  या गुंतवणूकदार जागृती कार्यक्रमांची माहिती सेबीच्या गुंतवणूक संकेतस्थळावर (इन्व्हेस्टर वेबसाइट) उपलब्ध आहे:
  http://investor.sebi.gov.in

**नेहमीचे प्रश्न आणि ऑनलाइन साधन या संकेतस्थळांवर उपलब्ध:**

| | |
|---|---|
| **संकेतस्थळ:** | www.sebi.gov.in |
| **इन्व्हेस्टर संकेतस्थळ:** | http://investor.sebi.gov.in |
| **संकेतस्थळ:** | www.bseindia.com |
| **संकेतस्थळ:** | www.nseindia.com |
| **संकेतस्थळ:** | www.nsdl.co.in |
| **संकेतस्थळ:** | www.cdslindia.com |
| **संकेतस्थळ:** | www.msei.in |

भारतीय प्रतिभूति आणि विनिमय बोर्ड
(सेबी भवन)
प्लॉट नं. सी ४-ए, 'जी' ब्लॉक, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०००५१.
दूरध्वनीः +९१-२२-२६४४९०००/४०४५९०००
संकेतस्थळः https://www.sebi.gov.in
गुंतवणूकदार संकेतस्थळः http://investor.sebi.gov.in
इंटरॅक्टिव्ह व्हॉइस रिस्पाँस सिस्टम (आयव्हीआरएस) दूरध्वनीः +९१-२२-२६४४९९५०/४०४५९९५०
टोल फ्री इन्व्हेस्टर हेल्पलाइनः १८०० २२ ७५७५ व १८०० २६६ ७५७५
गुंतवणूकदारांच्या तक्रारींकरिताः http://scores.sebi.gov.in

बीएसई लि.
२५वा मजला, पी.जे. टॉवर्स, दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई- ४०० ००१
दूरध्वनीः ०२२ २२७२१२३३/३४
संकेतस्थळः www.bseindia.com
ई-मेल आयडीः is@bseindia.com

नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लि.
एक्सचेंज प्लाझा, सी-१, ब्लॉक जी, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.
दूरध्वनीः (०२२) २६५९८१०० - ८११४
फॅक्स नं.: (०२२) २६५९८१२०

नॅशनल सिक्युरिटीज डिपॉजिटरी लि.
ट्रेड वर्ल्ड, 'ए' विंग, ४था व ५वा मजला, कमला मिल्स कंपाऊंड, लोअर परेल, मुंबई- ४०० ०१३.
दूरध्वनीः (०२२) २४९९ ४२००   फॅक्सः (०२२) २४९७ ६३५१
इन्व्हेस्टर हेल्पलाइन नं.:१८०० १०२० ९९० / १८०० २२४ ४३०
संकेतस्थळः www.nsdl.co.in

सेंट्रल डिपॉजिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लि.
मॅरेथॉन फ्यूचरेक्स, 'ए' विंग, २५वा मजला, मफतलाल मिल्स कंपाऊंड,
एन. एम. जोशी मार्ग, लोअर परेल (पूर्व), मुंबई- ४०० ०१३.
टोल फ्री हेल्पलाइनः १८०० २०० ५५३३
संकेतस्थळः www.cdslindia.com

मेट्रोपॉलिटन स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लि.
२०५ ए, दुसरा मजला, परीमल अगस्त्या कॉर्पोरेट पार्क,
सुंदर बाग लेन, कमानी जंक्शन, एल. बी. एस. रोड,
कुर्ला - वेस्ट, मुंबई - ४०००७०
कार्यालयः +९१ २२ ६११२ ९०००